cmyk

## संपादकीय

### मोदींचा अमेरिकेवर प्रभाव

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या अमेरिकेतील भाषणातून इंडियन डायस्पोर (अमेरिकेतील भारतीय)ला आकर्षित करून घेतले. त्यांनी भाषणाच्या वेळेस मोदी यांच्या समर्थनार्थ विशेषतः भारतीय महिलांनी मोदी, मोदी यांचा जो जयघोष केला तो मोदी यांच्या लोकप्रियतेची चुणूक दाखवणारा तर होताच पण मोदी यांनी भारताला किती जागतिक देशांच्या रांगेत आणून बसवले आहे, याचे प्रत्यंतर आणणारा होता. मोदी, मोदी अशा घोषणांच्या गदारोळात न्यूयॉर्कमधील भाषणात मोदी यांनी भारतीय लोकांना प्रभावित करतानाच भारताचे आजच्या आंतरराष्ट्रीय जगतातील महत्त्वही अधोरेखित केले.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### सप्टेंबर अखेरपर्यंत लाडक्या बहिणींना मिळणार तिसरा हप्ता

छ.संभाजीनगर : मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या तिसरा हप्त्याच्या प्रतीक्षेत असलेल्या बहिणींची चिंता मिटली आहे. राज्यातील पात्र महिलांच्या खात्यात सप्टेंबरअखेरीस तिसरा हप्ता जमा होणार आहे. याबाबत शासनाची तयारी पूर्ण झाली असून ३० सप्टेंबरपर्यंत ही रक्कम खात्यात पडणार आहे. तसेच ज्यांना अद्याप जुलै, ऑगस्टचे पैसे मिळालेले नाहीत त्या पात्र महिलांच्या खात्यात एकरकमी तीन महिन्यांचे पैसे पडणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–१५४ बुधवार दि.२५ सप्टेंबर २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

# सोयाबीनला ६ हजार भाव देणं सरकारला शक्य

## सरकारने १३ हजार कोटी खर्च केले तर सोयाबीनला ६ हजार भाव मिळेल

**मुंबई । प्रतिनिधी**

**सोयाबीनला हमीभाव द्यायचा की शेतकरी मागतात त्याप्रमाणं ६ हजार रुपये भाव द्यायचा हे आता सरकारच्याच हातात आहे. शेतकरी म्हणतात त्याप्रमाणे हमीभावाने खरेदी करून सरकारने क्विंटलला ११०० रुपयांचा बोनस दिला तर शेतकऱ्यांना ६ हजार रुपये भाव पडेल. बरं यासाठी सरकारला शेतकऱ्यांना केवळ १२ ते १४ हजार कोटी रुपये द्यावे लागतील. आता सरकार नको तिथे एवढा खर्च करतं मग शेतकऱ्यांसाठी १२ ते १४ हजार कोटी रुपये देऊ शकत नाही का?असा प्रश्नही शेतकरी विचारत आहेत.**



सध्या मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रातील शेतकरी सोयाबीन हमीभाव नको तर त्यापेक्षा जास्त भाव पाहीजे यासाठी आंदोलन करत आहेत. मध्य प्रदेशातील आंदोलन जास्तच पेटलं. शेतकऱ्यांची मागणी ६ हजार रुपये भावाची आहे. सरकारने ६ हजारानेच सोयाबीन खरेदी करावी अशी मागणी शेतकरी करत आहेत. पण जर सरकार हमीभावाने म्हणजेच ४ हजार ८९२ रुपये खरेदी करणार असेल तर सरकारने सर्व शेतकऱ्यांना क्विंटलमागे ११०० रुपयांचे अनुदान द्यावे. यामुळे शेतकऱ्यांना ६ हजार रुपये भाव मिळेल, असाही पर्याय शेतकऱ्यांनी दिला. जर देशात उत्पादन होणाऱ्या सर्व सोयाबीन क्विंटलमागे ११०० रुपयांचे अनुदान दिले तरी सरकारवर फार मोठा बोजा पडेल असेही नाही. समजा यंदा वाढलेली पेरणी आणि चांगला पाऊस असल्याने यंदा देशात १२० लाख टन उत्पादन झाले. म्हणजेच १२०० लाख क्विंटल. जर क्विंटलला ११०० रुपयांचे अनुदान द्यायचे म्हटल्यावर १३ हजार २०० कोटींचा खर्च करावा लागेल. आता उत्पादन यापेक्षा काहीसे कमी जास्त होऊ शकते. पण खर्च काही मोठ्या प्रमाणात वाढणार नाही. सरकार आता नको तिथे मोठ्या प्रमाणात खर्च करते. मग देशातील कोट्यवधी सोयाबीन उत्पादकांच्या भल्यासाठी सरकारला १३ हजार २०० कोटींचा खर्च करणं काही जड जाणार नाही. सोयाबीनचा बाजारभाव हमीभाव म्हणजेच ४ हजार ८९२ रुपयांच्या दरम्यान यावा असेल वाटत असेल तर सरकारला जास्त सोयबीन खरेदी करावे लागेल. तसंच सोयाबीन खरेदी केल्यानंतर ३ ते ५ दिवसांत शेतकऱ्यांना सोयाबीनचे पैसे द्यावे लागतील. अनेक राज्य सरकारं आधी शेतकऱ्यांना खरेदीचे पैसे देतात आणि नंतर नाफेडकडून घेतात. आपल्या राज्य सरकारलाही हेच करावे लागले. त्यासाठी सरकारला जास्त खर्च करावा लागणार नाही. समजा सरकारने २० लाख टनांची खरेदी केली तरी हमीभावानुसार सरकारला १० हजार कोटींपेक्षा जास्त खर्च करावा लागणार नाही. पण सरकारने जर शेतकऱ्यांना गरज

◀◀ पान २ वर

## परतीच्या पावसामुळे सोयाबीन पुन्हा पाण्याखाली

**पुणे । प्रतिनिधी**

बहरात असलेले सोयाबीनचे पीक काढणीला येताच परतीच्या पावसाने दोन्ही जिल्ह्यात धुमाकूळ घातला असून हाता तोंडाशी आलेले पीक पुन्हा पाण्याखाली गेले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून आणखी पावसाची शक्यता असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहे. दुसरीकडे मजुरांकडून शेतकऱ्यांची अडवणूक सुरू झाली असून पावसाच्या भीतीने शेतकरी मोठी मजुरी देऊन



सोयाबीनची काढणी करताना दिसत आहेत.

गेल्या दोन दिवसापासून दोन्ही जिल्ह्यात परतीच्या पावसाने हजेरी लावण्यास सुरवात केली आहे. यंदा पावसाळ्यात चांगला पाऊस पडल्याने

◀◀ पान २ वर

## रासायनिक खतांची लिकिंगसह खरेदी बंद

**पुणे । प्रतिनिधी**

सध्या कृषी निविष्ठा,रासायनिक खते विक्रेते लिकिंगमुळे आर्थिकदृष्ट्या भरडले जात असल्यामुळे शनिवार (ता. २१) रोजी नाशिक अॅग्रो डिलर्स असोसिएशनची (नाडा) या मुद्द्यावर बैठक पार पडली. झालेल्या बैठकीमध्ये संपूर्ण जिल्ह्यात कुठेही रासायानिक खते लिकिंग मटेरियलसह खरेदी करू नये असा सुर विक्रेत्यांचा होता. त्यानुसार खते लिकिंगसह खरेदी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

खतांच्या लिकिंगमुळे शेतकऱ्याला मोठा आर्थिक फटका बसतो तसेच विक्रेत्यांना कृषी विभागाचाही त्रास सहन करावा लागत आहे. रासायनिक खते विक्रीचा व्यवसाय करताना कुठलाही मानसिक त्रास सहन करावा लागू नये तसेच लिकिंगमुळे होणारे आर्थिक नुकसान होऊ नये यासाठी रासायनिक खते लिकिंग खरेदी बंद करणे गरजेचे आहे, असा भूमिका बैठकीत मांडण्यात आली. सर्व कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी एकजूट दाखवली तर निश्चितच यावर चांगला मार्ग निघेल असे

◀◀ पान २ वर

## जयंत पाटलांचे अजित पवारांना नवे चॅलेंज

नाशिक । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची शिवस्वराज्य यात्रा नाशिक जिल्ह्यातील चांदवडमध्ये पोहोचली. यावेळी झालेल्या कार्यक्रमात कांदा निर्यातबंदीचा मुद्दा मांडत असताना जयंत पाटलांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांना डिवचले. अजित पवारांनीकांदा निर्यात बंदीबद्दल माफी मागितली होती. त्याचा उल्लेख करत जयंत पाटलांनी अजित पवारांना नवे आव्हान दिले.

शिवस्वराज्य यात्रेत बोलताना जयंत पाटील म्हणाले, जेव्हा शेतक-याकडे कांदा असतो. तेव्हा भाजप निर्यात बंदी करते. कांदा शेतक-



याकडून व्यापा-याकडे गेला की, निर्यातीचे कर कमी करते, निर्यातबंदी उठवते. राज्याच्या एका उपमुख्यमंत्र्याने इथे येऊन माफी मागितली. आमची माफीची अपेक्षाच नाही अशी शब्दात जयंत पाटलांनी अजित पवारांना डिवचले. जयंत पाटील पुढे म्हणाले,

◀◀ पान २ वर

### राज्यात चौथ्या आघाडीची शक्यता!

अकोला: आगामी विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात महायुती आणि महाविकास आघाडी सोबतच तिसरी आघाडीनेही पुढचे पाऊल टाकले आहे. त्यात आता आणखी एक नवी आघाडी होण्याची शक्यता आहे. वंचित बहुजन आघाडीचे सर्वोसर्वा अॅड. प्रकाश आंबेडकर हे शेतकरी नेते रविकांत तुपकर यांना सोबत घेण्याची चाचपणी केली जात असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच पक्षांनी जोरदार मोर्चेबांधणी केली आहे. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडी असा पर्याय

◀◀ पान २ वर

# महायुतीत मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण?

## अजित पवारांची भूमिका स्पष्ट



मुंबई । प्रतिनिधी

महायुतीमधील तीन पक्षात काही आलबेल नसल्याची टीका सातत्याने होत असते. मात्र, महायुतीमध्ये सर्वकाही आलबेल आहे, पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत तिन्ही पक्षातील जागावाटप पूर्ण होईल. तसेच, तिन्ही पक्षातील इच्छुक उमेदवारांना तिकीट न मिळाल्यास त्यांची नाराजी दूर करण्याचं काम तिन्ही पक्षाच्या प्रमुखांचं आहे. त्यानुसार, आम्ही विधानसभा निवडणुकांना विकासकामांच्या आणि केंद्रात व राज्यात एकाच विचारांचं सरकार असल्याच्या माध्यमातून सामोरे जात आहोत, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. यावेळी, महायुतीमधील मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण, किंवा महायुतीचं सरकार आल्यास मुख्यमंत्री कोण, या प्रश्नावरही अजित पवार यांनी परखडपणे भूमिका मांडली.

राज्यात पुढील महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात विधानसभा निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाने महाराष्ट्र दौरा आखला असून आढावा घेण्यासाठीची तयारीदेखील केली आहे. त्यामुळे, राजकीय पक्षाचे नेते विविध दौरे आणि सभांच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधत आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेही जनसन्मान

◀◀ पान २ वर

## साखर कारखाने १५ नोव्हेंबरला सुरू होणार

**पुणे । प्रतिनिधी**

मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा उसाचे क्षेत्र २ लाख हेक्टरने कमी झाले आहे. त्याचबरोबर साखर कारखान्यांसाठी परिपक्व उसाचा पुरवठा व्हावा आणि रिकव्हरी चांगली निघावी यासाठी मंत्री समितीच्या बैठकीत गाळप हंगाम सुरू करण्यासाठी १५ नोव्हेंबर ही तारीख एकमताने ठरवण्यात आली आहे. त्यामुळे यंदा मागील वर्षीच्या तुलनेत १५ दिवसांनी उशिरा साखर कारखाने सुरू होणार आहेत.

राज्यातील कोल्हापूर, सांगली, सोलापूर परिसरातील ऊस मोठ्या प्रमाणावर कर्नाटक राज्यातील साखर कारखान्यांसाठी जातो. पण यंदा कर्नाटक राज्यातही साखर कारखाने १५ नोव्हेंबर रोजी सुरू होणार आहेत. त्यासंदर्भातील पत्र त्यांनी महाराष्ट्राला दिल्यामुळे आपण १५ नोव्हेंबर रोजी गाळप हंगाम सुरू करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आल्याची माहिती आहे. दिवाळीनंतर साखर कारखाने सुरू करावेत अशी मागणी 'विस्मा'ने साखर आयुक्तालयाकडे केली होती.

## रिक्षात आठ तलवारी घेऊन जात असतांना एकाला अटक

### चकलांबा पोलिसांची कार्यवाई; अठरा हजाराचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी

चकलांबा पोलिस ठाणे हद्दीतील दूरक्षेत्र उमापुर पोलिस चौकीची हद्दीत एक ईसम रिक्षात गेवराईकडे आठ तलवारी घेऊन जात असल्याची माहिती गूप्त बातमीदाराने चकलांबा पोलिसांना दिली तसेच चकलांबा पोलिसांनी सदरचा रिक्षा व एकजन याला ताब्यात घेतले आहे तसेच या कार्यवाईत १८ अंदाजे हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती चकलांबा पोलिस ठाण्याचे सपोनि नारायण एकशिंगे यांनी दिली आहे. सदरची कार्यवाई (दि २४ सप्टेंबर ) रोजी साडे सहाच्या दरम्यान केली आहे.

◀◀ पान २ वर



## रेल्वे मार्गाच्या अडचणींसंदर्भात आ.क्षीरसागरांनी घेतली बैठक

### तक्रारी असलेल्या मार्गावर तात्काळ पाहणी करून कार्यवाही करण्याच्या सूचना

**बीड । प्रतिनिधी**

बीड मतदारसंघातुन जाणाऱ्या रेल्वे मार्गावर नागरिकांना अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. रेल्वे मार्गाच्या कामात अनेक त्रुटी असल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. तसेच काही ठिकाणी अपघात होत आहेत. या भागातील नागरिकांनी यासंदर्भात अनेकवेळा रेल्वे



विभागाशी अनेकवेळा संपर्क केला आहे. परंतु रेल्वेकडून कुठलाही सकारात्मक प्रतिसाद नागरिकांना मिळाला नाही. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी सोमवार (दि.२३) रोजी रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन प्रत्यक्ष, सविस्तर चर्चा करून तक्रारी असलेल्या ठिकाणांची तात्काळ पाहणी करून येथील अडचणी दूर करण्यासंदर्भात सत्वर कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

बीड मतदारसंघातून नगर-बीड-परळी रेल्वे मार्ग मोठ्या प्रमाणात गेलेला आहे. याचे कामही मोठ्या प्रमाणावर झाले आहे. परंतु या कामांमध्ये अनेक त्रुटी

◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२४ सप्टेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७.५० क्विंटल | २,४०१ | ३,३०२ | २,८७७ |
| ज्वारी/हायब्रिड:८४.०० क्विंटल | १,८५० | २,६५१ | २,२९२ |
| मूग : ४८.५० क्विंटल | ६,१०१ | ८,००० | ७,२४७ |
| तूर :१.०० क्विंटल | ७,००० | ८,९३० | ७,९६५ |
| उडीद : १२८.५० क्विंटल | ४,५०० | ७,५०१ | ६,६७६ |
| बाजरी : २९.०० क्विंटल | २,१७५ | ४,१०० | २,५३० |
| मुग : १६.५० क्विंटल | ६,५१० | ७,५५० | ७,२०५ |
| सोयाबीन:११७.५० क्विंटल | ३,४२५ | ४,०४१ | ३,७३५ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ८,२५० | ८,२५० | ८,२५० |

# राजकोट किल्ल्यावरील शिवरायांचा पुतळा १०० वर्षे टिकणार

## सरकारने काढली निविदा

सिंधुदुर्ग । प्रतिनिधी

जिल्ह्यातील मालवण मधील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळल्यानंतर शिवप्रेमी भावना संतप्त होत्या. २६ ऑगस्टला ही घटना घडल्यानंतर आता तब्बल एका महिन्याच्या आत राज्य सरकारने मालवण मधील राजकोट किल्यावर पुन्हा छत्रपती शिवाजी महाराजांचा ६० फूट उंच तलवारधारी पुतळा उभारणार आहे. यासाठी महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने २० कोटी रुपयांची निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग मार्फत ही निविदा प्रक्रिया केलेली आहे.

राज्य शासनाने राजकोट किल्ला वर छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याची रचना, अभियांत्रिकी,



बांधकाम, उभारणी, संचलन आणि देखभाल दुरुस्ती करण्याची निविदा प्रसिद्धी केली आहे. यासाठी सुमारे २० कोटी रुपये खर्च गृहीत धरण्यात आला आहे. काम पूर्ण करण्यासाठी सहा महिन्याची मुदत देण्यात आलेली आहे. पुतळा कोसळल्यानंतर एका महिन्याच्या आत ही निविदा राज्य शासनाने जाहीर केल्यामुळे नवीन पुतळ्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी आता राज्य शासन महत्त्वाची पावले उचलत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा ६० फूट उंच तलवारधारी पुतळा उभारणार पुतळा दुर्घटनेनंतर पुतळा उभारण्यासाठी एक कमिटी देखील स्थापन करण्यात आली होती. त्या कमिटीच्या अहवालानुसार नवीन पुतळा उभारण्याचे काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या महायुती सरकारने तातडीने हाती घेतले आहे.स्टॅच्यू ऑफ लिबर्टी म्हणून ओळखले जाणाऱ्या सरदार वल्लभभाई पटेल या पुतळाच्या

◀◀ पान २ वर

cmyk

cmyk



अग्रलेख

# मोदींचा अमेरिकेवर प्रभाव

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या अमेरिकेतील भाषणातून इंडियन डायस्पोर (अमेरिकेतील भारतीय) ला आकर्षित करून घेतले. त्यांनी भाषणाच्या वेळेस मोदी यांच्या समर्थनार्थ विशेषतः भारतीय महिलांनी मोदी, मोदी यांचा जो जयघोष केला तो मोदी यांच्या लोकप्रियतेची चुणूक दाखवणारा तर होताच पण मोदी यांनी भारताला किती जागतिक देशांच्या रांगेत आणून बसवले आहे, याचे प्रत्यंतर आणणारा होता. मोदी, मोदी अशा घोषणांच्या गदारोळात न्यूयॉर्कमधील भाषणात मोदी यांनी भारतीय लोकांना प्रभावित करतानाच भारताचे आजच्या आंतरराष्ट्रीय जगतातील महत्त्वही अधोरेखित केले. मोदी यांनी म्हटले की, मी देशासाठी आपले जीवन देऊ शकणार नाही पण मी देशासाठी प्राण कुर्बान करायला तयार आहे. त्यांच्या या वाक्याने त्यांची देशाप्रति असलेली निष्ठा व्यक्त होतेच पण मोदी यांच्यामागे देश का आहे याचेही स्पष्टीकरण मिळते. मोदी म्हणतात की, मी पहिला पंतप्रधान आहे की जो देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जन्मला आहे. मोदी यांनी म्हटले की, कोट्यवधी लोकांनी भारतासाठी प्राण दिले आहेत पण आम्ही सारे जीवन देशासाठी त्यागण्यास तयार आहोत. मोदी यांच्या काळात देश तिसऱ्या क्रमांकाची अर्थसत्ता झाला.

देशाने प्रचंड प्रगती केली आणि ज्या ज्या क्षेत्रांत अमेरिका आहे त्या क्षेत्रात भारतही मागे नाही. चांद्रयान असो की जी-२० शिखर परिषद असो, भारताने यशस्वी आयोजन करून अमेरिकेपेक्षा तसूभरही कमी नाही हे दाखवून दिले आहे. भारताचा आंतरराष्ट्रीय लौकिक वाढत असतानाच भारताने आर्थिक बाबतीत मैलाचा दगड गाठला आहे आणि भारताने तिसऱ्या क्रमांकाची अर्थसत्ता म्हणून झेप घेतली आहे. तीही इंग्लंडसारख्या देशाला मागे टाकून. त्यामुळेच भारताची दखल अमेरिकेसारख्या देशाला घ्यावी लागली आहे. जो देश हत्ती आणि सापांचा देश म्हणून ओळखला जात होता त्या देशाने केलेली प्रगती मोदी यांनी देशाला दिलेली भेट आहे हे निःसंशय. पंतप्रधान मोदी यांनी भारतीय समाजाची प्रशंसा केली ती त्यांच्या आपल्या कार्यक्षेत्रातील कर्तृत्वाची दखल घेऊन. पण मोदी यांनी भारतीय जनमानसाबद्दल जे गौरवोद्गार काढले ते कालच्या प्रसंगाला साजेसेच होते. अमेरिकेतील भारतीय समाज हा सर्वात प्रामुख्याने पुढारलेला आणि प्रगत समाज आहे आणि या भारतीयांचे अमेरिकेतील स्थान हे लक्षणीय आहे. त्यांचे अमेरिकेतील निवडणुकीतील प्रभाव टाकू शकणारे स्थान हे कुणालाही हेवा वाटण्याजोगे आहे आणि हे मोदी यांचे कर्तृत्वाचे यश आहे. मोदी यांच्यामुळे भारत आज जगातील सर्वात शक्तिशाली अर्थव्यवस्था आहे आणि भारताची आजची अवस्था ही कुणालाही हेवा वाटण्याजोगी आहे. पूर्वी इंदिरा गांधी जेव्हा अमेरिकन दौऱ्यावर जात होत्या तेव्हा अमेरिकन अध्यक्ष भारतीय पंतप्रधानांकडे ढुंकूनही पाहत नसत.

रशियाचा पाठिंबा मिळवण्यासाठी इंदिरा गांधी जेव्हा अमेरिकेत तत्कालीन अध्यक्षांना भेटायला गेल्या तेव्हा इंदिरा गांधी यांना भेटही नाकारली होती. आज कोणत्याही अमेरिकन नेत्याची तशी हिंमत नाही.

याच भाषणात मोदी यांनी एक नवा संदेश दिला आहे तो म्हणजे, एआय म्हणजे अमेरिकन इंडियन. दोन देशांना जोडून केलेला हा वाक्यप्रयोग निश्चितच दोन्ही देशांना पुढे घेऊन नेणारा असेल. भारतातील अमेरिकन लोक खूश झाले यात काही शंका नाही पण भारतातील तमाम लोक यामुळे खूश झाले. कारण मोदी यांनी दोन्ही देशांतील लोकांना सहकाऱ्याची साद दिली आहे. याच दौऱ्यात बोलताना मोदी यांनी क्वाड ही कोणालाही विरोध करण्यासाठी नाही असे सांगितले. हा एक महत्त्वपूर्ण संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. कारण क्वाडमुळे चीनला विरोध करण्यासाठी स्थापना केली आहे असा गैरसमज पसरला होता. पण तो मोदी यांच्या भाषणाने दूर झाला आहे. मोदी यांनी भारतीयांना राष्ट्रदूत असे संबोधले यावरून त्यांची देशाप्रति असलेली निष्ठा दिसते. कारण आपल्याबरोबर लोकांना घेऊन जायची त्यांची निष्ठा यावरून दिसते. मोदी यांनी अनेक मुद्द्यांना स्पर्श केला आहे, पण त्यांच्या भाषणातील लोकांना प्रभावित करणारे मुद्दे हेच आहेत की, त्यांनी अमेरिकेतील निवडणुकीवरही मतप्रदर्शन केले आहे. गेल्या निवडणुकीच्या वेळेस ट्रम्प हे एक उमेदवार होते आणि आताही ते उमेदवार आहेत. पण आता मोदी यांनी ट्रम्प यांना निःसंदिग्ध पाठिंबा दिला नाही, तर त्यांनी काही हातचे राखून पाठिंबा दिला आहे. कारण बायडेन हेही एक चांगले उमेदवार आहेत आणि याची जाण मोदी यांनी ठेवली आहे. मोदी यांच्या या भाषणातून काही मुद्दे ठळकपणे समोर आले आहेत आणि ते म्हणजे भारतीयांचे अमेरिकेत असलेले वाढते वर्चस्व. पूर्वी हे पाकिस्तान्यांच्या बाबतीत खरे असायचे. अर्थात पाकिस्तान्यांचे असलेले वर्चस्व म्हणजे त्यांनी कर्तृत्वाने मिळवलेले नव्हते तर अमेरिकेची गरज म्हणून त्यांना पाकिस्तानची साथ करावी लागायची. पण आज मोदी यांनी संपूर्ण परिस्थिती उलटवली आहे आणि आज अमेरिका भारताला साथ देण्याच्या मनस्थितीत आहे. कारण त्यांना तसे करणे भाग आहे. कारण एक तर भारताची ताकद वाढली आहे आणि दुसरी बाब म्हणजे भारताने आर्थिक बाजू प्रचंड सावरली आहे.

भारत आज मजबूत स्थितीत आहे आणि जवळपास अमेरिकेच्या इतकेच भारताचे स्थान आहे. त्यामुळे भारताला दुर्लक्षून चालणारच नाही. या परिस्थितीत अमेरिकेला भारताच्या म्हणण्याला मान डोलवण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. मोदी यांचे हे भाषण भारताचे महत्त्व अधोरेखित करणारे होते आणि भारतीयांचे महत्त्वही ठळकपणे सांगणारे होते. न्यूयॉर्कच्या लाँग आयलंडमधील भाषणात मोदी यांनी आपल्या सेमी कंडक्टर कार्यक्रमाची प्रशंसाही केली आणि यावेळी ते म्हणाले की, भारत हा पुढे चालतो, मागे चालत नाही. भारत आज संधींची भूमी आहे हे त्यांचे उद्गार भारताच्या आजच्या स्थितीचे दिशादर्शन करणारे आहेत तसेच भारत आज कितीतरी प्रगत आहे हे दाखवून देणारे आहेत. भारताची प्रगती दाखवणारे हे भाषण मोदी यांनी करून भारत आज पहिल्यासारखा देश राहिला नाही हे दाखवून दिले आहे.

# चार हायवावर चकलांबा पोलिसांची कार्यवाई

## दिड कोटींचा मुद्देमाल जप्त

**गेवराई । प्रतिनिधी**

राक्षसभूवन व परिसरातून अवैध वाळूची तस्करी केली जात असल्याची माहिती चंकलाबा पोलिस ठाण्याचे सपोनि नारायण एकशिंगे यांना मिळाली तसेच त्यांनी सदर ठिकाणी सापळा लाऊन चार हायवा ताब्यात घेतल्या आहेत तसेच या कार्यवाई दरम्यान एका हायवाने पलायन केले त्यांच्या विरूद्ध गून्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती असून तसेच या कार्यवाईत अंदाजे दिड कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आहे.तसेच ही कार्यवाई ( दि २४ सप्टेंबर ) रोजी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास केली आहे.



याबाबद सविस्तर माहिती अशी की,चकलांबा पोलिस ठाणे हद्दीतील राक्षसभूवन व सुरळेगाव याठिकाणा वरूण अवैध वाळू वाहतूक केली जात असल्याची माहिती गूप्त बातमीदाराने चकलांबा पोलिस ठाणे प्रमुख सपोनि नारायण एकशिंगे यांना दिली तसेच सदर ठिकाणी पोलिसांनी सापळा लाऊन चार हायवा ताब्यात घेतल्या आहेत तसेच या कार्यवाई दरम्यान एक हायवा याने पलायन केले असल्याची माहिती आहे यावर चकलांबा पोलिसांत गून्हा दाखल केला आहे सदरच्या कार्यवाईत अंदाजे दिड कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे तसेच ही सगळी वाहने पुढील कार्यवाईसाठी चकलांबा पोलिस ठाण्यात लावण्यात आली आहेत. सदरची कार्यवाई बीड पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ,अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर,उप विभागीय पोलिस अधीकारी नीरज राजगूरू,यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि नारायण एकशिंगे,पोउपनि अंनता तांगडे,पोह हनूमान इंगोले,पोह कल्याण पवार,पोशी तूकाराम पवळ पोशी विनोद सुरवसे,पोशी किरण मिसाळ, पोशी प्रशांत घोंगडे यांनी केली आहे.

# धनश्री भालचिम यांच्या आश्वासनमुळे मत्स्योदरी देवी संस्थान समोरील उपोषण मागे

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड चे तहसीलदार तथा संस्थांचे अध्यक्ष विजय चव्हाण यांच्या दुर्लक्षामुळे संस्थांमध्ये भ्रष्टाचार होत असल्याचे बोलल्या जात आहे. तहसीलदार विजय चव्हाण यांनी सदरील तक्रारदारांची दखल ना घेतल्यामुळे आजपासून देवस्थान समोर उपोषण सुरू करण्यात आले होते. परंतु उपोषण करते उपोषणला बसले असता त्या ठिकाणी नायब तहसीलदार धनश्री भालचिम यांनी तात्काळ दखल घेऊन उपोषण करते यांना पत्र देऊन उपोषण सोडण्यात आले. या तक्रारीची चौकशी करण्यासाठी ८ ऑक्टोबर रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे तसेच याबाबतचे पत्र देवी संस्थान व्यवस्थापक कैलास शिंदे यांना देण्यात आली आहे त्यांच्याकडून खुलासा मागण्यात येणार आहे.

अंबड शहर व पंचक्रोशी बरोबर संपूर्ण राज्यात नवसाला पावणारी माता मत्स्योदेवी म्हणून अंबड येथील श्री मत्स्योदरी मातेचा महिमा सर्वश्रुत असून लाखो भक्तजनांचे आराध्य दैवत आहे.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी निर्माण केलेल्या मंदिरास पूजेअर्चेसाठी,देखभाल दुरुस्तीसाठी ४३० एकर जमीन दान स्वरूपात दिली आहे. श्रद्धास्थान असणाऱ्या या प्रसिद्ध देवस्थानाची मात्र आज रोजी मनमानी व्यवस्थापन व गलथान कार्यप्रणालीमुळे संस्थानाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत



आहेत. यासंदर्भात संस्थान व्यवस्थापक कैलास शिंदे यांना विचारले असता ते म्हणाले की पुढच्या वर्षापासून देवी संस्थान मंगल कार्यालय तिची जबाबदारी माझ्यावर राहणार नाही यासाठी संस्थान मार्फत ई टेंडर करून चालविण्यात येणार आहे असे ते म्हणाले तसेच ते म्हणाले की संबंधित तक्रारदार व्यक्ती लग्न चा कार्यक्रम होता त्यावेळी थोडा वेळ लाईट गेली होती त्यामुळे त्या व्यक्तीला राग आल्यामुळे त्यांनी तक्रार केली असावी परंतु लाईट गेली तर त्याचा संस्थांचा काही संबंध नसतो असे व्यवस्थापक कैलास शिंदे यांनी सांगितले. देवी संस्थानात होणाऱ्या भ्रष्ट कारभाराची चौकशी करण्यात यावी यासाठी दिनांक २४ सप्टेंबर पासून देवीच्या मुख्य प्रवेशद्वारावर आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते सदरील उपोषण मागे घेण्यात आले. याबाबत अर्जुन दामोदर राऊत यांनी अंबड तहसीलदार तथा मत्स्योदरीदेवी संस्थानाचे अध्यक्ष यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजी दिलेल्या निवेदनानुसार तहसीलदार तथा संस्थांचे अध्यक्ष विजय चव्हाण येणे वीस दिवसापासून कोणतीच दखल न घेतल्याने उपोषण करण्याचा वेळ माझ्यावर आला आहे. मत्स्योदरीदेवी संस्थान मधील भ्रष्टाचाराची चौकशी करून देवी संस्थानाच्या व्यवस्थापनातील गलथान कारभाराविषयी रीतसर तक्रार व निवेदन सादर करून देखील कार्यवाही करण्यात आली नाही. यामुळे दिनांक २४ सप्टेंबर आज वार मंगळवार रोजी पासून देवी मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आमरण उपोषण करण्यात आले होते. मोठी आर्थिक उलाढाल असणाऱ्या देवी संस्थानाचा कारभार सातत्याने वादग्रस्त व मनमानी पद्धतीने चालवला जातो. देवी संस्थानाचे असणारे पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर बहुउद्देशीय सभागृहाचा अक्षरशः बाजार मांडलेला आहे. गोरगरीब, शेतकरी,कष्टकरी यांना या सभागृहात लग्नकार्य व इतर विधी करणे अशक्य होते. यामुळे निश्चित दर असणे आवश्यक ठरते. अत्यंत गंभीर बाब म्हणजे देणगी स्वरूपात व सभागृहाच्या भाड्याची रक्कम संस्थानात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक फोन पे वर जमा करून घेतली जाते. तक्रारदार व उपोषणकर्ते यांचे तब्बल ५५ हजार रुपये संस्थानातील कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक फोन पे वर घेतले असल्याचे पुराव्यासह तक्रारदारांनी नमूद केले आहे. व्यवस्थापक व कर्मचारी यांच्या भ्रष्ट,बेजबाबदार,उर्मट, लबाड कामचुकार कारभाराविषयी आलेल्या सर्व तक्रारींची चौकशी करण्यात यावी अशी मागणी उपोषण करते अर्जुन राऊत यांनी केली आहे. उपोषणकर्त्यांच्या मागण्या या रास्ता असल्याची जनभावना सर्वसामान्य जनता बोलून दाखवत आहे .

# पुरवठा विभागाचे नवीन निरीक्षण अधिकारी खांडेभराड रुजू

**जालना । प्रतिनिधी**



महाराष्ट्र शासनाने महसूल अंतर्गत असलेली पुरवठा विभागातील नायब तहसीलदार अधिकारी यांचे पद काढून आता नवीन पद निरीक्षण पुरवठा अधिकारी असे करण्यात आले आहे यामुळे राज्यातील सर्व तहसील अंतर्गत पुरवठा विभागातील नायब तहसीलदार यांचे पद बरखास्त करण्यात आले आहे संबंधित अधिकारी यांना विभागीय आयुक्त कार्यालय येथे रुजू करून घेण्यात आली आहे यामुळे अंबड तहसील कार्यालयाचे धान्य पुरवठा विभागाचे प्रमुख निरीक्षण अधिकारी किरणकुमार खांडेभराड यांनी पदभार स्वीकारला यावे ते म्हणाले की मी नागपूर जिल्हा अंतर्गत धान्य पुरवठा निरीक्षक म्हणून स्वस्त धान्य दुकाना तपासणी अधिकारी १० वर्ष म्हणून शासनाची सेवा बजावली आहे आता माझे पदोन्नती झाल्यामुळे मी अंबड तहसील कार्यालयाचा धान्यपुरवठा विभागाचे निरीक्षण अधिकारी म्हणून पदभार स्वीकारला. काही आमदारांच्या तक्रारीवरून मी नागपूर जिल्हा अंतर्गत ५० राशन दुकाना वर कारवाई करून स्वस्त राशन दुकान रद्द केल्या होत्या असे त्यांनी सांगितले.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक प्रशिक्षण तयारी

**जालना । प्रतिनिधी**

**आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ प्रक्रियेच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उप जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात अधिकारी यांच्या सार्वत्रिक निवडणूक पूर्वतयारी प्रशिक्षणाचे आयोजन केले होते.**



विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने यावेळी प्रशिक्षणात पात्रता-अपात्रता, नामांकन, गुन्हेगारी पूर्ववृत्तांबद्दल सूचना, नामांकन सुरक्षा, मतदान केंद्र तपासणी, अतीसंवेदनसिल मतदान केंद्र निश्चित करणे, मतदान केंद्र आणि मतमोजणी केंद्राचे नियोजन, एमसीएमसी, पेड न्यूज, आदर्श आचारसंहितेचा भंग, स्वीप, ईव्हीएम-व्हीव्हीपॅट, पोस्टल मतदान, सी-व्हीजील प्रणाली आदी विषयावर सविस्तर माहिती देण्यात आली. प्रारंभी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ म्हणाले की, विधानसभा निवडणूकीसाठी खुप कमी कालावधी राहिला आहे. याकरीता निवडणूक प्रक्रियेतील सर्व यंत्रणांनी निवडणुकीच्या कामाचे सुक्ष्म नियोजन करुन जबाबदारीने कामे पार पाडावीत. तसेच सोपविण्यात आलेल्या जबाबदारीची पूर्वतयारी करावी. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार,जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, जिल्हा सूचना अधिकारी आर. पी. पडळकर,उपविभागीय अधिकारी श्रीमंत हारकर, उपविभागीय अधिकारी दिपक पाटील, डॉ. दयानंद जगताप, पद्यमाकर गायकवाड यांनी निवडणूकीच्या अनुषंगाने विविध विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी प्रशिक्षणास सर्व तहसिलदार, नायब तहसिलदार यांच्यासह विविध विभागातील अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.



# घरावर वीज पडून संसार उपयोगी साहित्य जळून खाक

**घनसावंगी । प्रतिनिधी**

घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगाव येथे झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसात घरावर वीज पडून संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले आहे.घनसावंगी तालुक्यात व परिसरात काल जोरदार पावसासह विजांच्या कडकड्यासह पाऊस झाला यामध्ये कुंभार पिंपळगाव येथील रहिवाशी बाळासाहेब मुसुळे यांच्या राहत्या घरावर वीज पडली ज्यात सुदैवाने ज्या घरात ही वीज पडली त्या घरात मुसुळे परिवार नव्हता मात्र त्याच घरातील असणाऱ्या दुसऱ्या रूम मध्ये हा परिवार होता म्हणून जीवितहानी टाळली दरम्यान घरातील असणारे संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले आहे.

# पान १वरून...

## सोयाबीनला ६ हजार

असते त्याप्रमाणे पैसे दिले नाहीतर केवळ खेरदी सुरु करून फायदा होणार नाही. ज्या शेतकऱ्यांना लगेच पैशांची गरज आहे ते शेतकरी खुल्या बाजारात हमीभावापेक्षा कमी दरात सोयाबीन विकतील. यामुळे खुल्या बाजारातील भाव आणखी कमी होण्यास मदत होईल. म्हणजेच काय तर सरकार आपल्या खुल्या बाजारातील सोयाबीनचे भावही हमीभावाच्या दरम्यान वर आणू शकते आणि शेतकऱ्यांना ६ हजार रुपयांचाही भाव देऊ शकते. यासाठीचे पर्याय शेतकऱ्यांनीच सांगितले आहे. कारण आंतरराष्ट्रीय बाजारातील परिस्थितीत सध्या तरी सोयाबीनमध्ये मोठ्या तेजीला पुरक नाही. पुढच्या काळात परिस्थिती बदलली तर चित्र वेगळं दिसू शकतं. पण सुरुवातीच्या काळातच शेतकऱ्यांचा जास्त माल बाजारात येत असतो. पहिल्या ३ महिन्यातच सरकारच्या आधाराच्या गरज आहे. नंतर परिस्थिती बदलली तर बाजारात बदल दिसू शकतो. ते पुढच्या पुढे दिसेल. पण सध्या सरकारन बाजारात उतरून शेतकऱ्यांना आधार देण्याची गरज आहे.

--------------

## जयंत पाटलांचे अजित

त्यांनी (अजित पवार) ठामपणाने सांगावे की, भारतामध्ये शेतीमालाच्या निर्यातील आम्ही कधीही बंदी करणार नाही. एवढे त्यांनी मोदी साहेबांकडून काम करून घेतले ना, तरी जो खड्डा पडलाय त्यांच्यासाठी तो भरून निघेल. देशामध्ये राहू दे, पण एवढे जरी त्यांनी सांगितले की, कांदा निर्यातबंदी मोदींचे सरकार असेपर्यंत कधीही होऊ देणार नाही. आणि तशी लेखी ऑर्डर जर काढली. २०२९ पर्यंत नो निर्यात बंदी. कांद्यावर निर्यात शुल्क नाही, अशी गॅरंटी जर दिली, तर थोडा बहुत विश्वास ठेवता येईल असे जयंत पाटील म्हणाले. शेतक-यांकडे ज्यावेळी कांदा असेल, त्यावेळी बरोबर निवडणुका झालेल्या असतील. निर्यात शुल्क लावायला दिल्ली मोकळी झालेली असेल. शेतक-यांना दाबून देशातील कांद्याची किंमत वाढू द्यायची नाही. पाकिस्तानातील कांदा दुसरीकडे महाग दराने विकला, तर चालतो. पण, आपला कांदा बाहेर जाऊ द्यायचा नाही. ही अशी मनात पाप असणारी प्रवृत्ती दिल्लीत पुन्हा नितीश कुमार आणि चंद्राबाबू यांच्या आधाराने जाऊन बसली अशी टीका जयंत पाटील यांनी केली.

-----------

## रासायनिक खतांची

बैठकीत स्पष्ट करण्यात आले. बैठकीला नाशिक ॲग्रो डिलर्स असोसिएशनचे पदाधिकारी, नाशिक जिल्ह्यातील तालुकाध्यक्ष तसेच सभासद व कृषी निविष्ठा विक्रेते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. रासायनिक खते उत्पादक कंपन्या दुकानदारांना खते लिंकिंगसह विक्री करतात.मात्र अनेकदा शेतकऱ्यांना खरेदीचा आग्रह करता येत नाही.त्यामुळे खते दुकानातच पडून राहतात. तसेच काही प्रसंगी शेतकरी व विक्रेते यांच्यामध्ये वादाचे प्रसंगही घडतात तर दुसरीकडे आर्थिक तोटाही होतो.त्यामुळे मनस्ताप टाळण्यासह आर्थिक नुकसान होऊ नये यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

--------------

## परतीच्या पावसामुळे

सोयाबीन व खरिपातील पिके जोमदार आहेत. गेल्यावर्षी परतीच्या पावसाने हुलकावणी दिली होती. यामुळे यंदाही सोयाबीनची काढणी झाल्यानंतर परतीचा पाऊस येईल, असे चित्र असतानाच पावसाने धुमाकूळ घालण्यास सुरवात केली आहे. पावसाच्या अगोदर सोयाबीनच्या काढणीला शेतकऱ्यांनी वेग दिला आहे. यामुळे सध्या शिवारांमध्ये लगबग सुरू असून पावसाने नुकसान होण्याआधी पिकांच्या काढणीसाठी शेतकरी धावपळ करत आहेत. याचा फायदा मजुरांकडून उठवला जात असून मजुरांच्या टोळक्यांनी मजुरीचे भाव वाढवून शेतकऱ्यांची अडवणूक सुरू केली आहे. उंच वाढलेले सोयाबीन काढणीसाठी मजुरांशिवाय पर्याय नसल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. यातच मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने काही भागात सोयाबीनचे पीक पुन्हा पाण्याखाली गेले आहे. काही भागात काढणी करून शेतात ठेवलेले सोयाबीन गोळा करण्याआधीच पावसाच्या तावडीत सापडल्याने नुकसान झाले आहे. २१ दिवसापूर्वी जिल्ह्यात अतिवृष्टी होऊन पिके पाण्याखाली गेली होती. त्याचा परिणाम पिकांच्या उत्पन्नावर झाला. यातच परतीच्या पावसामुळे पिके जाग्यावर उद्ध्वस्त झाली आहेत.

-----------

## महायुतीत मुख्यमंत्रीपदाचा

यात्रेच्या निमित्ताने राज्यभर दौरे असून आज एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत अजित पवारांनी विधानसभेच्या तयारीची माहिती दिली. तसेच, महायुतीत सर्वकाही आलबेल असून महायुती म्हणून आम्ही विधानसभा निवडणुका लढवू आणि, त्या निवडणुकांना सामोरे जाऊ, असेही त्यांनी म्हटले. यावेळी, महायुतीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण, महायुतीचं सरकार आल्यास मुख्यमंत्री कोण होणार, यावरही त्यांनी भाष्य केलं.

-----------

## राज्यात चौथ्या

असतानाच तिसऱ्या आघाडीचाही पर्याय पुढे आला आहे. राज्यात 'परिवर्तन महाशक्ती' नावाने तिसरी आघाडीने एक पाऊल पुढे टाकले आहे. त्यासाठी स्वाभिमानी पक्षाचे अध्यक्ष राजू शेट्टी, स्वराज्य पक्षाचे प्रमुख युवराज संभाजीराजे, प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदार बच्चू कडू, महाराष्ट्र राष्ट्र समितीचे शंकरअण्णा धोंडगे, स्वतंत्र भारत पक्षाचे वामनराव चटप, नारायण अंकुशे यांच्या उपस्थितीत बैठक झाली. त्यानंतर या नेत्यांनी 'परिवर्तन महाशक्ती' या आघाडीची घोषणा केली आहे. दरम्यान, आता राज्यात आणखी एक पर्याय पुढे येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. वंचित बहुजन आघाडी आणि शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्यात ही आघाडी होण्याची शक्यता आहे. तशी चाचपणी सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. लोकसभा निवडणुकीत शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी अपक्ष निवडणूक लढविली होती. अपक्ष असूनही या निवडणुकीत मतदारांनी त्यांना चांगला प्रतिसाद दिला होता. तब्बल अडीच लाखांवर तुपकरांना मतदान झाले होते. बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा, बुलढाणा, मेहकर आणि चिखली या मतदारसंघात तुपकर यांना चांगली मते मिळाली होती. तर तुपकरांशिवाय तिसरी आघाडी अपूर्ण असल्याचं मत आंबेडकर यांनी व्यक्त केले होते. तर रविकांत तुपकर हे तिसऱ्या आघाडीत जाणार नसल्याचं त्यांनी अकोल्यात स्पष्ट केलं होतं.

--------------

## रिक्षात आठ तलवारी घेऊन

बीड पोलिस अधीक्षक यांच्या आदेशानुसार कायदा व सुवेस्थेला बाधा आणर्नाय़ा ईसमा विरूद्ध कडक कार्यवाईचे आदेश दिले असल्याने आज गोपनिय बातमीदाराने चकलांबा पोलिसांना एम एच १६ एसी ४१६ या रिक्षात एकजन आपल्या अर्थिक फायद्यासाठी आठ तलवारी गेवराईकडे घेऊन जात असल्याची माहिती दिली तसेच त्यावरून चकलांबा पोलिसांनी सदरचा रिक्षा व चालक व त्यातील एक प्रवासी याला ताब्यात घेऊन विचारपुस केली असता त्याने त्यांचे नाव रतन देवराव पवार ( वय ४३ वर्ष ) असे सांगितले तसेच तलवारी बाबद परवाना असल्याचे विचारले असता त्याच्याकडे कुठलाही परवाना मिळून आला नाही तसेच एक रिक्षा वरील एकास पोलिसांनी ताब्यात घेतले असून या प्रकरणी गून्हा दाखल करण्याची प्रक्रीया चकलांबा पोलिसांत सुरू असून सदरची कार्यवाई बीड पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ ,अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर,उप विभागीय पोलिस अधीकारी नीरज राजगूरू,सपोनि नारायण एकशिंगे यांच्या मार्गदर्शनाखी पोउपनि अंनता तागडे,पोअ तूकाराम पवळ,पोशी विनोद सुरवसे,पोशी प्रशांत घोंगडे,यांनी केली आहे

--------------

## रेल्वे मार्गाच्या अडचणींसंदर्भात

असल्यामुळे या भागातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रेल्वे पुलांच्या खाली पावसामुळे नेहमीच खूप जास्त पाणी साचून राहते. त्यामुळे येथून वाहतूक करणे अवघड होते. ऊस वाहतूक करणारी वाहने याठिकाणाहून जाऊ शकत नाही. वाहतुकीची अडचण होत असल्याने या परिसरात रहिवाशी असलेले १५ ते २० हजार लोकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. काही ठिकाणी रोड तिरका झाल्याने अपघात होत आहेत. या होत असलेल्या अडचणींमुळे येथील नागरिकांनी आतापर्यंत रेल्वे विभागाकडे अनेकवेळा संपर्क केला. परंतु नागरिकांना याबाबत रेल्वेकडून कुठलाही सकारात्मक प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.२३) शासकीय विश्रामगृह, बीड येथे रेल्वे विभागाचे संबंधित अधिकारी यांची बैठक घेतली. यावेळी रेल्वे मार्गाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या अडचणी संदर्भात अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून अडचणी दूर करण्यासाठी संबंधित ठिकाणच्या प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासकीय स्तरावर तात्काळ कार्यवाही सुरु करण्याच्या सूचना आ.क्षीरसागर यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीस आ.संदीप क्षीरसागर यांच्यासह माजी आ.सय्यद सलीम, रेल्वे विभागाचे सर्व संबंधित अधिकारी व या भागातील नागरिक उपस्थित होते.

-----------

## राजकोट किल्ल्यावरील शिवरायांचा

धर्तीवर मालवणमध्ये राजकोट किल्लावर छत्रपती शिवाजी महाराजांचा ६० फूट उंच तलवारधारी पुतळा उभारण्यात येणार आहे. यामध्ये सर्व गोष्टींची काळजी देखील घेण्यात येणार आहे. नव्याने उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या कामात यावेळी कोणत्याही प्रकारच्या त्रुटी राहू नयेत, यासाठी राज्य शासनाने ५०० पेक्षा जास्त पानाचे निकष असणारी निविदा काढली आहे.आता मालवण मधील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची १०० वर्ष गॅरंटी असणार आहे, अशी माहिती देखील हा निविदेत आहे. तसेच १० वर्षे या पुतळ्याची देखभाल दुरुस्ती त्या ठेकेदाराने करायची आहे. ३ फुटाचे फायबर मॉडेल तयार करून ते कलासंचलनांकडून मंजुरी मिळाल्यानंतर या कामाला सुरवात होणार आहे. आयआयटी पवई यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अनुभव असणाऱ्या व्यक्तींना हा पुतळा उभारण्याचे काम देण्यात येणार असल्याचे अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. २६ ऑगस्ट ला पुतळा कोसळल्यानंतर सर्वच ठिकाणी शिवप्रेमीच्या संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत होत्या. पण आता नव्याने पुतळा उभारणीचे काम राज्य शासनाने हाती घेतल्यामुळे कुठेतरी शिवप्रेमी समाधान व्यक्त केलं जातं आहे.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि.२५ सप्टेंबर २०२४


## ज्योती नगरच्या ओपन स्पेस मधील अतिक्रमण हाटवा

अंबाजोगाई -प्रतिनिधी अंबाजोगाई शहरातील ज्योती नगर परिसरातील ओपस स्पेसवर करण्यात आलेले अतिक्रमण हटवा या मागणीचा ठराव कॉलनीच्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते घेण्यात आला व या मागणीचा ठराव नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांच्याकडे कारवाईसाठी देण्यात आला आहे.



अंबाजोगाई शहरात मध्यवर्ती ठिकाणी ज्योती नगर ही कॉलनी आहे. या कॉलनीत ओपन स्पेस मध्ये डॉ.बाबासाहेब उद्यान आहे. या उद्यायानावर अनेक जणांनी अनाधिकृतपणे पत्र्यांचे शेड ठोकलेले आहेत. ते हाटविण्यात यावेत असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला व कॉलनीतील सर्व रहिवाश्यांनी हा ठराव नगर परिषदेच्या मुख्याधिकार्यांना दिला असून या संदर्भात अतिक्रमण हाटविण्याची कारवाई करण्याची मागणी यावेळी महिल

# आष्टी तालुक्यातील घोंगडेवाडी येथे स्टोन क्रशरवर वीजचोरी

## महावितरणच्या कारवाईत चालकाला १७ लाखांचा दंड

**आष्टी। प्रतिनिधी**

तालुक्यातील घोंगडेवाडी येथे स्टोन क्रशर चालकाकडून गेल्या २० महिन्यांपासून अनधिकृतरित्या अतिरिक्त दुहेरी वीजपुरवठा जोडून सुरू असलेल्या वीजचोरीचा प्रताप महावितरणच्या भरारी पथकाने गुरुवारी केलेल्या कारवाईत उघड झाला. महावितरणचे १७ लाखांचे नुकसान केल्याप्रकरणी क्रशर चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय भरारी पथकाचे उपकार्यकारी अभियंता राहुल भाऊराव जायभाये यांनी याप्रकरणी आष्टी पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे. महावितरणच्या उपसंचालकांच्या आदेशान्वये जायभाये यांनी सहाय्यक सुरक्षा व अंमलबजावणी अधिकारी अभिजित जाधव, वरिष्ठ तंत्रज्ज्ञ दत्ता किवणे तंत्रज्ज्ञ योगेश नक्कलवार यांच्या समवेत तालुक्यातील घोंगडेवाडी येथे वीजग्राहक तानाजी बाबासाहेब अनभुले यांच्या सर्वे क्रमांक १३७/ई मध्ये ता. ५ सप्टेंबर रोजी तपासणी केली असता वीजमीटरवरील जोडभार हा ट्रान्सफॉर्मरच्या बुशिंगपासून स्टोन क्रशरकडे जाणाऱ्या अतिरिक्त एलटी लाईन केबलला जोडणी घेऊन वीजचोरी सुरू असल्याचे आढळून आले. स्टोन क्रशरवर केलेल्या तपासणीत २० महिन्यांपासून येथे ९२ हजार

४६८ युनिट वीजेची चोरी करण्यात आल्याचे उघड झाले असून या प्रकरणी महावितरणकडून स्टोन क्रशर चालक तानाजी अनभुले यांनी १६ लाख ६१ हजार ११० रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. याच ग्राहकावर सलग दुसऱ्यांदा वीजचोरीची कारवाई करण्यात आल्याने तडजोडीस पात्र नसल्याचे याप्रकरणी आष्टी पोलिस ठाण्यात जायभाये यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

### परवाना नसताना सुरू होता कारभार

दरम्यान, आष्टी तालुक्यात एकूण १९ खडी क्रेशर आहेत. यापैकी केवळ चार खडी क्रशर अधिकृत असून उर्वरित अनधिकृत खडी क्रशर चालकांचे परवाने नूतनीकरण झाले नसल्याने अनधिकृत ठरविण्यात आले आहेत. कारवाई करण्यात आलेल्या खडी क्रशरचाही यामध्ये समावेश आहे.

# माजलगाव शहरातुन हातगाडा होतोय हद्दपार

## आधुनिकीकरणामुळे हातगाड्या चालवणाऱ्यावर आली उपासमारीची वेळ

**ज्योतीराम पांढरपोटे/ माजलगाव**

स्वातंत्र्यपूर्व काळ आठवला तर त्यावेळी वाहतुकीच्या साधनांची फारशी सोय नव्हती. मालवाहतुकीसाठी हातगाड्या असायच्या.आता जमाना बदलला आहे.पूर्वी मालवाहतूक करणाऱ्या हातगाड्याही हाद्दपार होण्याच्या मार्गावर आहेत.निजाम राजवटीत साहित्यांची ने-आण करण्यासाठी हातगाड्या याशिवाय पर्यायघ नव्हता. स्वातंत्र्योत्तर काळातही हातगाडे बरीच वर्षे शहराच्या ठिकाणी पाहायला मिळत होती.मात्र वाहननिर्मिती क्षेत्रात वाढ झाल्याने अनेक कंपन्यांनी मालवाहतुकीबरोबरच प्रवाशी वाहतुकीच्या सोयीसाठी अनेक प्रकारची वाहने बाजारात आणली आहेत,ज्यामुळे काम



सोपे झाले आहे. हातगाड्यांच्या जागी आता छोटी आधुनिक वाहने आली आहेत. त्यामुळे जुनी साधनं काळाच्या पडद्याआड चाललेली आहे.माजलगाव शहरात

निजाम राजवटी पासुन शहराच्या मुख्य बाजारपेठेत, मोंढ्यात जवळपास शंभरहून अधिक मालवाहतूक करणाऱ्या

### माजलगाव शहरात उरले फक्त दोनच हातगाडे

हातगाड्यांची संख्या होती. कामगार हातगाड्या साह्याने रात्रंदिवस काम करायचे. खासकरून बसस्थानकात हातगाडे दिसायचे. रोजगाराची ही मोठी केंद्रे असल्यामुळे मालवाहतूक करण्याची वर्दी हमखास मिळायची.

कष्ट जास्त, मोबदला कमी

माजलगाव शहराची भौगोलिक रचना चढ-उताराची आहे.अशा भागात हातगाडी चालविणे मोठे कष्टाचे काम असते.मात्र कष्टाच्या बदल्यात मिळणारा मोबदला फारच कमी असल्यामुळे हातगाड्या ओढणाऱ्या कामगारांची आर्थिक स्थिती सुधारणे अवघड असल्याचे गेल्या अनेक वर्षांपासून हातगाडा ओढण्याचे काम करणारे माजलगाव

### हातगाड्यांना अजूनही मागणी

जवळची मालवाहतूक करण्यासाठी अजून हातगाड्यांना मागणी आहे.माजलगाव शहरात काही हातगाडे पाहायला मिळतात. भाजीपाला, नारळाची पोती, गाद्या,टिकाऊ वस्तूंचे बॉक्स, बांधकामाचे स्टील, कपाटे अशा वस्तू दुकानातून घरापर्यंत नेण्यासाठी हातगाड्यांचा वापर होताना दिसतो. तसेच गोडावूनमधील माल दुकानापर्यंत नेण्यासाठीही हातगाडी वापरली जाते.कमी पैशात ही वाहतूक होत, असल्याने आजही हातगाड्यांना मागणी आहे.

शहरातील फुलेनगर येथील शेख बशीर यांनी दै राज्य लोकतंत्रशी बोलताना सांगितले.

# श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात महीला सुरक्षा सप्ताह संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात महीला सुरक्षा सप्ताह दि २४ सप्टेंबर मंगळवार रोजी मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.



श्रीमती रंजना गोसावी दिवानी न्यायाधीश कनिष्ठ, कुलकर्णी दिवानी न्यायाधीश कनिष्ठस्तर,माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, मुख्याध्यापक संतोष लिंबकर, उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे, इत्यादी मान्यवरांच्या हस्ते विद्येची अधिष्ठात्री देवता माता सरस्वती,व राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन संपन्न झाले.आहेर सर,यांनी सांघिक पद्य सांगितले. मुख्याध्यापक संतोष लिंबकर प्रास्ताविकात म्हणाले,की सद्य परिस्थितीत ज्या अनपेक्षित घटणा घडत आहेत. त्या विषयी हे संकुल अतिशय दक्ष आहे.

विद्यालयात सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.विद्यार्थी व पालक यांच्या साठी तक्रार पेटी उपलब्ध आहे.यानंतर प्रमुख अतिथि म्हणून मार्गदर्शन करताना श्रीमती रंजना गोसावी दिवानी न्यायाधीश कनिष्ठ स्तर त्या म्हणाल्या. जगण्याचा अधिकार, विकासाचा अधिकार, बाल मजुरी,प्रतिबंध कायदा, बाल विवाह,प्रतिबंध कायदा इत्यादी कायदे,विद्यार्थ्यांनी वाचावेत.त्याच प्रमाणे अल्पवयीन, व किशोरवयीन मुलींसोबत अमानवीय अत्याचाराच्या घटणा घडतात. आपली आई सोडून आपल्या कुठल्याही खाजगी अवयवांना स्पर्श करण्याचा अधिकार कोणालाही नाही. वाईट स्पर्श बॅड टच आपणास कोणी करत असेल तर ही घटणा तात्काळ प्रथमतःआपली आई,वडील,किंवा आपले विश्वासू शिक्षक यांच्या निदर्शनास आणून द्यावी.त्यांनी दृक्? - श्रव्य साधनाच्या माध्यमातून किशोरवयीन विद्यार्थ्यांना हा विषय अवगत केला.अध्यक्षीय समारोप करताना प्रशांत भानप म्हणाले,अनपेक्षित स्पर्श,ही गोष्ट गंभीर आहे.यापासून विद्यार्थीनींनी सजग रहावे,सूचनांचे पालन करावे, आम्ही विशाखा समितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत जागरुक आहोतच. आपण हा उपक्रम आम्हाला सुचित केला निश्चितच आम्ही याचे अतिशय दक्षतेने पालन करु.

उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे यांनी आभार मानले.या कार्यक्रमासाठी प्रशांत भानप, संतोष लिंबकर, उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे, सदाशिव ढगे, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख अपर्णा मुळे,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती पल्लवी कानडे यांनी केले.आदिनाथ कुंडकर यांनी सांगितलेल्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

# स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर शाळेत ‘भान‘ शिबिराचे यशस्वी आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पौगंडावस्था म्हणजे मुलांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील टप्पा. या काळात त्यांच्यात शारीरिक, मानसिक व भावनिक बदल होत असतात. ज्यामुळे मुलांना अनेक प्रकारच्या प्रश्नांचा सामना करावा लागतो. या वयात त्यांच्यात असुरक्षितता, आत्मविश्वासाचा अभाव आणि बदलत्या शरीराबद्दल अनिश्चितता असते. योग्य मार्गदर्शनाच्या अभावामुळे त्यांची विचारसरणी व वर्तनावर परिणाम होऊ शकतो. या काळात त्यांना योग्य समुपदेशन आणि योग्य दिशा देणे अत्यंत आवश्यक असते. अन्यथा





अनेक अडचणीच्या प्रसंगांना सामोरे जावे लागते. कित्येकवेळा मुलामुलींच्या आयुष्यावर परिणाम करणाऱ्या घटना या काळात घडू शकतात म्हणून या वळणावर मुलामुलींना भानावर आणणे गरजेचे असते.

यामुळेच स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर शाळेत इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी पौगंडावस्थेतील अशा आव्हानांना सामोरे जाण्यासाठी ‘‘भान‘‘ शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे तीन दिवसीय शिबिर दि. १९, २० आणि २१ सप्टेंबर २०२४ रोजी शाळेत आयोजित करण्यात आले होते. श्रीमती वैशाली गोस्वामी यांनी विद्यार्थ्यांना पौगंडावस्थेतील शारीरिक व मानसिक बदल, त्यांचे परिणाम, आणि या बदलांना कसे हाताळावे याबाबत सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी या शिबिरादरम्यान त्यांचे प्रश्न विचारले व प्रशिक्षक वैशाली ताईंनी त्यांच्या शंकांचे निरसन केले, तसेच मनमोकळेपणाने संवाद साधला.

नवक्षितिज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय संतोष दादा कुलकर्णी परवानगीने, व शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती स्वरुपाताई दिग्रसकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सर्व शिक्षकवृंद यांच्या सहकार्यातून हा उपक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला. शाळेच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# एच आय व्ही संवेदीकरण व जनजागृती शिबिर

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

समाजात एचआयव्ही आजाराबाबत असलेली नकारात्मक भीती व आजारी रुग्णांबाबत असलेले वैरभाव याबाबत वडवणी तालुक्यातील उपळी येथे एचआयव्ही संवेदीकरण व जनजागृती पर शिबिराचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते.



बीड जिल्हा एडस नियंत्रण विभाग व आयसीटीसी चिंचवन यांच्या संयुक्त विद्यमाने उपळी येथील ग्रामपंचायत येथे एचआयव्ही या आजाराबाबत माहिती व रुग्णांबाबत समाजात असलेली नकारात्मकता व वैरभाव याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमास सरपंच सचिन हाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. एच आय व्ही या आजाराची बाधा होण्याची प्रमुख कारणे त्याचबरोबर उपाय योजना, लक्षणे आढळल्यास शासकीय रुग्णालयात असणारी उपचार पद्धती याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली. सन २०१७ च्या कायद्यानुसार एच आय व्ही बाधितांचे अधिकार व लक्षणे आढळल्यास रुग्णालयाच्या टोल फ्री नंबर वर संपर्क साधण्यासाठी जनजागृती समुपदेशक प्रसाद ठोसर यांनी केली. या शिबिरास उपळी येथील ग्रामपंचायत सदस्य, प्रतष्ठित ग्रामस्थ श्रीमंत सावंत,शेख नय्युम सहशिक्षक चव्हाण,शेख जान मोहम्मद, रुस्तुम सावंत लिंक वर्कर डावरे उपस्थित होते.

# चिंचोटी येथे गटविकास अधिकारी नागरगोजे यांनी केली विकास कामांची पाहाणी

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील चिंचोटी येथे ग्रामपंचायत च्या वतीने विविध विकास कामे चालू आहे त्या कामांना वडवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांनी धावती भेट दिली होत असलेल्या चांगल्या कामांची प्रशंसा करत त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.गावच्या विविध विकास कामांसाठी शासनाकडून निधी आणुन चांगली काम करत आसल्याने गावचे सरपंच ऊप सरपंच व ग्रा प सदस्यांचा गावकऱ्यांच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

सविस्तर वृत्त असे की चिंचोटी ग्रामपंचायत ला एक वर्षाचा कालावधी पूर्ण होण्याच्या अगोदर धडाडीचे युवा सरपंच भागवत गोंडे उपसरपंच गोविंद गोंडे यांच्यासह सर्व टीमने शासनाकडून लाखो रुपयांचा निधी खेचून आणत गावात विविध



विकास कामे करत आहेत.यामध्ये सार्वजनिक स्वच्छालय,शाळेसाठी आरो फिल्टर,शाळेतील विद्यार्थ्यांसाठी ७ एलईडी टी व्ही,शाळेला कंपाउंड वॉल,शाळेच्या ग्राउंड मध्ये पेवर ब्लॉक,शाळा दुरुस्ती,सिमेंट रस्ते,सांडपाणी व्यवस्थापनासाठी अंडरग्राउंड नाल्या,संपुर्ण गावात पेवर ब्लॉक रस्ते तयार करणे अदी काम प्रगती पथावर आहेत.या विविध विकास कामांची पाहणी करण्यासाठी वडवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांनी धावती भेट दिली व कामांची पाहणी करून कामे चांगली होत असल्याचे त्यांनी समाधान व्यक्त केले.ग्रामपंचायत च्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार ही करण्यात आला.गावात चांगल्या क्वालिटीचे होत असलेले विविध विकास कामांवर गावकऱ्यांनी समाधान व्यक्त करत गावकऱ्यांच्या वतीने युवा सरपंच भागवत गोंडे ऊप सरपंच गोविंद गोंडे ग्रा प सदस्य गोरख तात्या गोंडे साहेबराव गोंडे बाळू सोनवणे केशव बापू गोंडे अदी पधादी काऱ्यांचा सत्कार करण्यात आला कार्य क्रमासाठी विधाका शेतकरी कंपनीचे अध्यक्ष समाज सेवक धनपाल गोंडे, आदिनाथ अंबाड मुरली येळवे केशव गोंडे दादासाहेब गोंडे यादव गोंडे झुंबर गोंडे नवनाथ बादाडे नवनाथ उबाळे मोहन बादाडे कल्याण गोंडे गणेश गोंडे केशव शिंदे राम पंडित बंडु पंडीत इंद्रजीत पाचनकर पिनू पाचणकर शेख युसुफ शेख बशीरभाई,सुदाम गोंडे ग्राम पंचायत सेवक भाऊसाहेब गोंडे, मिनीनाथ ऊबाळे अदी उपस्थीत होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमंत मुन्ना गोंडे यांनी केले तर आभार मा सरपंच राम पंडित यांनी मानले.

आम्ही सतेवर येऊन एक वर्ष ही झाले नाही.या कालावधीत चांगला निधी आणुन कामही चांगल्या क्वालिटीचे करण्याचा आमचा प्रमाणीक उद्देश आहे व करत आहोत.येत्या काळात आपल्या गावाचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी आजुन भरपुर काम करायची आहेत.त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी खेचुन आणु त्यासाठी आपल्या सर्व गावकऱ्यांची सहकार्याची अपेक्षा आहे.कृपया कुणीही विकास कामामध्ये आडथळा आणु नका आशी विनंती

-भागवत संतराम गोंडे (सरपंच)

पान ६ वरून...

### आरक्षण हक्क परिषदेस मोठ्या

तसेच सुप्रसिद्ध शाहिर दत्ता शिंदे , शा. दत्ता पाईकराव , शा. सुरेश रंझवे , शा. स्वितम इंगळे , शा. सुमित साळवे , शा. युवराज ढगे , शा. सौरभ सिरसाठ आदि शाहीरांच्या भिमगितांचा जलसा आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमाचे आयोजन वशिष्ठ लांडगे , वैजनाथ गडसिंग , राजकुमार मोरे , विशाल ससाने , धम्मानंद गावडे , सय्यद अन्वर , गंगाधर सोनपसारे , भास्कर पौळ , शेख अर्शद , विश्वनाथ तोडके , साहेबा टाकणखार , आनंद साळवे , कच्छिद्र कांबळे , विलास खळगे , विशाल साळवे यांनी केले आहे तरी माजलगाव तालुक्यासह बीड जिल्ह्यातील तमाम संविधान प्रेमी जनतेने या ऐतिहासिक आरक्षण हक्क परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन स्वाभिमानि नेते विजय साळवे यांनी केले आहे.

### राज्यात प्रथमच बाल

शैलेश गोजमगुंडे, प्रमुख कार्यवाह सतिश लोटके, राजू तुलालवार, दिपक रेंगे, दिपाली शेळके, आसेफ अन्सारी यांच्यासह सर्व कार्यकारिणी मंडळ, यहा के हम सिकंदर दिव्यांग महोत्सव समितीचे धनंजय जोशी, नंदकिशोर जुवेकर, दिपाली शेळके, नागसेन पेंढारकर बीड शाखेचे डॉ.संजय पाटील देवळाणकर, स्नेहल पाठक, शाहीर विलास सोनवणे, अनुराधा चिंचोलकर, प्रा.दुष्यंता रामटेके आदींनी केले आहे.

नोंदणी, अधिक माहितीसाठी संपर्क साधावा

नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्कासाठी विजय राख ९८३३३४५८०९, दिपक जमधाडे ८८८८८५०३५८, नामदेव साळूंके ८३०८३६३३३५, सुरेश थोरात ९४२२९११०९०, मिलींद शिवणीकर ९४२२९३०४९०, अमित गाडे ८८८८९५९७९२, प्रदिप भोकरे ९८२२५९९६९७, अक्षय फुलझळके ९६३७९९९६२९, सुरेश साळूंके ९८२३६०१४८० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# सुरुडी आश्रमशाळेचे मुख्याध्यापक सुधाकर राठोड यांना इंडियन आयकॉन राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर अंतर्गत शासकीय माध्यमिक आश्रम शाळा सुरुडी ता आष्टी जि बीड येथील मुख्याध्यापक सुधाकर प्रभू राठोड यांना इंडियन आयकॉन सन्मान महा सोहळ्यामध्ये राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



अमरदीप बाल विकास फाउंडेशन व महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने साहित्य मंदिर सेक्टर ६ एमजीएम रुग्णालयाजवळ वाशी नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या इंडियन आयकॉन सन्मान महासोळ्यामध्ये श्री सुधाकर प्रभू राठोड यांनी केलेल्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याबद्दल त्यांना अत्यंत मानाचा समजला जाणारा राष्ट्रीय ह्युमन वेल्फेअर आयकॉनिक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सुधाकर राठोड हे मागील सात वर्षांपासून शासकीय माध्यमिक आश्रम शाळा सुरुडी ता आष्टी जि बीड प्रकल्प छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी मुख्याध्यापक या पदावर कार्यरत आहेत . या पुरस्कारामध्ये सर्व सुरूडी शाळेच्या टीमचा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले.

पुरस्कार वितरण सोहळ्याला जीजस कॅम्पस (राष्ट्रीय वाणिज्यदूत, पनामा राष्ट्र), संगीता धायगुडे (से.नि.विभागीय उपायुक्त,नाशिक) डॉ.अमजदखान पठाण (कर्करोग शास्त्रज्ञ), ऍड.रमेश खेमू राठोड (वकील,सोशल ऍक्टिव्हिटी पुणे), नितीन देसाई (सिनेअभिनेता, हास्य कलाकार-तारक मेहता का उल्टा चश्मा फेम), उर्मिला डांगे (सिने अभिनेत्री), प्रसाद भागवत (सिने अभिनेता व दिग्दर्शक चित्रपट पावनखिंड फेम), कु. अन्वी घाटगे (जागतिक विक्रमवीर गिर्यारोहक), शैलेंद्र पवार (लेखक व गीतकार), सलमा एन. खान( सचिव अमरदीप बाल विकास फाउंडेशन), ह भ प उदय पाटकर,स्नेहा चांदुरकर, राजेंद्र मडवी, डॉ श्रेयश्री गोडावे, निवेदिका- गीतांजली वाणी व सदर सोहळ्याची संकल्पना व नियोजन नासिर खान (संस्थापक-महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्था) यांनी केले.

पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल अप्पर आयुक्त कार्यालय अमरावती येथील अपर आयुक्त जितेंद्र चौधरी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय छत्रपती संभाजी नगर येथील प्रकल्पाधिकारी श्रीमती चेतनाजी मोरे, माजी प्रकल्पाधिकारी श्रीमती देवकन्याजी बोकडे व सर्व अधिकारी कर्मचारी, शासकीय व अनुदानीत आश्रमशाळा प्रकल्प छत्रपती संभाजीनगर येथील सर्व मुख्याध्यापक, गृहपाल, अधीक्षक, अधीक्षिका,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षणाधिकारी कार्यालय बीड तथा गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती आष्टी येथील मा. सुधाकर यादव गटशिक्षणाधिकारी , सर्वअधिकारी कर्मचारी, व शासकीय माध्यमिक आश्रम शाळा सुरुडी येथील कर्मचारी नीता मुंडे, संभाजी मुसळे, उद्धव गांधले, संतोष मेहत्रे, सखाराम वनवे, विशाल दोरगे, कविता पानसरे, नवनाथ रेवणकर, प्रतीक्षा मेश्राम, सुरज शिंदे, केतन काकडे, प्रवीण पुंड, संगीता जाधव, वैजिनाथ आतकरे, एम जे सावंत, किसन शिंदे, शाहूराव सानप, चांगदेव पवार, वेणूबाई केसकर,मोहन जाधव,विलास जाधव, मच्छिंद्र शिरसाट, अमित पवार, बाबू हजारे , पालक समिती, विद्यार्थी व परिसरातील सर्व मान्यवरांकडून अभिनंदन केले जात आहे.

# धाराशीवच्या माळरानावर सिताफळाची सेंद्रीय शेती

## शेतकऱ्याला १० लाखाहून अधिक उत्पन्नाची अपेक्षा



मराठवाड्यातील दुष्काळी जिल्हा समजल्या जाणाऱ्या धाराशिवच्या माळरानावर सोयाबीन, ज्वारी, हरभरा अशा पारंपरिक पिकांचीच चलती असा समज आता हळूहळू शेतकरी स्वत:च मोडीत काढताना दिसत आहेत. धाराशिवच्या माळरानावर फळबागांची शेती करत संजय बोराडे या शेतकऱ्यानं जवळपास १० लाखांची कमाई केली आहे. विशेष म्हणजे संपूर्णपणे सेंद्रीय शेती करत हा नफा या शेतकऱ्यानं कमवलाय...कमीत कमी खर्चात फळबागांमधून उत्पन्न काढणं तसं जिकीरीचं काम. पण सहा एकरात सिताफळाची जैविक शेती हा शेतकरी करतो.

पारंपरिक शेतीला फाटा

धाराशिव जिल्ह्यातील पाथरूड गावातील शेतकरी संजय बोराडे यांची याआधी पारंपरिक शेतीच होती. सोयाबीन, उडीद, तूर, ज्वारी अशी पारंपरिक पिके ते घ्यायचे. २०२० मध्ये त्यांनी ६ एकर जमिनीवर फळबाग करायचा निर्णय घेतला. सरकारच्या भाऊसाहेब फुंडरकार योजनेअंतर्गत सोयाबीनचं आंतरपीक घेत सीताफळ लावले. आता या सीताफळातूनच संजय बोराडेंचं आर्थिक उत्पन्न लाखांच्या घरात आहे.

१५ लाख रुपये कमाईची अपेक्षा

संजय बोराडे यांनी आपल्या फळबागेत ६० टक्के जैविक आणि ४० टक्के रासायनीक खत, फवारण्यांचा वापर केला आहे. या वर्षी त्यांनी आपल्या शेतीत साडेतीन लाख रुपये खर्च केले असून ३० टन सीताफळ येण्याची अपेक्षा केली आहे. १४ ते १५ लाख रुपयांपर्यंत यंदा उत्पन्न निघेल अशी त्यांची आशा आहे. मागे दोन वर्षांपासून ते सीताफळ लावतायत. पहिल्यावेळेस ४ लाख तर दुसऱ्या वेळेस दुप्पट म्हणजेच ८ लाख रुपये उत्पन्न त्यांनी सीताफळातून कमावले होते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीनं केली शेती

संजय बोराडे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेत फळबाग फुलवली आहे. धाराशिवची जमीन तशी सीताफळाला पोषक असल्यानं त्यांनी सीताफळ लावण्याचा निर्णय घेतला. विशेष म्हणजे जैविक शेती करायचे त्यांनी ठरवले. पारंपरिक पिकांमधून उत्पन्न येत नसल्याचं लक्षात आल्यानंतर घेतलेला काहीसा साहसी निर्णय त्यांच्या पक्षात खरा उतरल्यानं आता गावात इतर शेतकऱ्यांनाही जैविक शेतीतून मिळणाऱ्या फायद्याविषयी ते सल्ला देतात.

# जनावरांना जीवघेणा 'घटसर्प' झाल्यास अशी घ्या काळजी



राज्यात काही भागात सध्या जनावरात घटसर्प आजाराचा प्रसार झाला असून यामुळे जनावरे दगावली आहेत. घटसर्प या आजाराला हेमोरॅजिक सेप्टिसिमिया तसेच डिप्थीरिया या नावाने सुद्धा ओळखतात. वातावरणातील बदलाचा परिणाम हा जनावरांवर देखील पाहवयास मिळतो. पावसाळ्याच्या तोंडावर घटसर्प ह्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव हा जनावरांमध्ये आढळून येतो. विशेषत: गाई आणि म्हशीमध्येच याची लक्षणे आढळतात. शिवाय हा संसर्गजन्य आजार असल्याने त्याचा फैलावही लवकर होतो. यावर वेळीच उपाय झाला नाही तर जनावरे दगावण्याचाही धोका असतो. त्यामुळे वेळीच लसीकरण करुन घेणे हाच यामधील सर्वोत्तम पर्याय आहे. जाणून घेऊ या आजाराविषयी आणि त्यावर उपचार पद्धती.

घटसर्प रोगाच्या प्रादुर्भावाची कारणे : पावसाचे पाणी साचणाऱ्या ठिकाणी हा आजार अधिक प्रमाणात आढळतो. शिवाय अस्वच्छ असलेल्या ठिकाणी जनावरे बांधली किंवा लांबचा प्रवास किंवा अतिकाम करून थकलेल्या प्राण्यांवर या आजाराचे जीवाणू हल्ला करतात. रोगाचा प्रसार खूप वेगाने होतो. आजारी जनावरांचा चारा, धान्य आणि पाणी यांचे सेवन आणि इतर जनावरे संपर्कात आली तर हा आजार होतोच. तसेच मादी प्राण्याच्या दुधाने त्याचा प्रसार होतो.

घटसर्प आजाराची लक्षणे : जनावरांना तीव्र ताप येतो, सुमारे १०५ ते १०६ डिग्री फॅ. पर्यंत हा ताप जातो. डोळे लाल आणि सुजलेले दिसतात, नाक, डोळे आणि तोंडातून स्त्राव वाहतो. मान, डोके किंवा पुढील पायांच्या दरम्यान सूज येते. श्वास घेताना पुटपुटण्याचा आवाज येतो, श्वास घेण्यास त्रास होऊन गुदमरून जनावरांचा मृत्यू सुद्धा होतो.

घटसर्प आजारावर उपचार : या आजारावर त्वरित उपचार करणे गरजेचे आहे. अन्यथा जनावराचा यामध्ये मृत्यूही होऊ शकतो. घटसर्पची लक्षणे आढळून आल्यास लागलीच पशूवैद्यकीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधून योग्य ती उपाययोजना करावी. जनावरांना दरवर्षी पावसाळयापूर्वी आजाराची लस जवळच्या पशुवैद्यक दवाखान्यात द्यावी. पावसळ्यापूर्वी लसीकरण करणे गरजेचे आहे. जनावरांना घटसर्प आजाराची लक्षणे दिसताच बाधित जनावरांना इतर निरोगी प्राण्यांपासून जनावर वेगळे करावे. आजारी जनावरांना नदी, तलाव, तलाव इत्यादी ठिकाणी पाणी पिऊ देऊ नका. बाधित जनावराच्या आधी निरोगी जनावरांना चारा, धान्य, पाणी इत्यादी द्यावे.

# आता 'एआय' तंत्रज्ञानातून गुलाबी बोंड अळीवर नियंत्रण

## केंद्रीय कापूस संशोधन संस्थेकडून प्राथमिक अवस्थेतच निरीक्षण

कापसातील गुलाबी बोंड अळीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. पंजाब, हरियाना हे राज्य यामुळे सर्वाधिक प्रभावित होतात. परिणामी कोट्यवधी रुपयांचे नुकसान शेतकऱ्यांना सोसावे लागते. त्या पार्श्वभूमीवर केंद्रीय कापूस संशोधन संस्थेने बोंड अळीचे प्राथमिक अवस्थेतच निरीक्षण नोंदविता यावे याकरिता देशात पहिल्यांदाच एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) पद्धतीचा वापर केला आहे. प्रायोगिक तत्त्वावर पंजाबमधील तीन जिल्ह्यांत हे तंत्रज्ञान वापरले जात आहे.

कापूस पिकात गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव गेल्या तीन वर्षांत वाढला आहे. उत्तर भारतातील पंजाब, हरियाना, राजस्थान हे तीन राज्य यामुळे दरवर्षी सर्वाधीक प्रभावित होतात. गुलाबी बोंड अळीच्या परिणामी सरासरी कापूस उत्पादकांचे वीस टक्के नुकसान होते. त्या पार्श्वभूमीवर या किडीच्या नियंत्रणासाठी पहिल्या टप्प्यात नर पतंगांना आकर्षित करण्यासाठी कामगंध सापळे (फेरोमॅन ट्रॅप) लावण्याची शिफारस केली जाते. हेक्टरी पाच सापळे लावण्याची शिफारस करण्यात आली आहे. सापळ्यातील पतंगाची मोजदाद करून त्याआधारे किडीचा प्रादुर्भाव नुकसान पातळीच्या वर आहे किंवा खाली हे ठरविण्यात येते. पाच टक्क्यांपेक्षा कमी प्रादुर्भाव नुकसान पातळीच्या खाली मानला जातो. मात्र या प्रक्रियेत शेतकऱ्यांना निरीक्षणात सातत्य राखावे लागते.

निरीक्षणाकडे दुर्लक्ष झाल्यास किडींकडून पिकाचा फडशा पडलाच म्हणून समजा. त्यामुळेच या क्षेत्रात निरीक्षणाकरिता आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञान वापरण्यात यावे, अशी मागणी होत होती. त्याची दखल घेत केंद्रीय कापूस संशोधन संस्थेने सादर केलेल्या एआय तंत्रज्ञान आधारित प्रकल्पाला केंद्राने निधी देत अंमलबजावणीस मान्यता दिली आहे.

पायलट प्रकल्प पंजाबमध्ये : गुलाबी बोंड अळी नियंत्रणासाठीच्या या पायलट प्रकल्पाची अंमलबजावणी पंजाब राज्यातील मुक्तसर, भटिंडा आणि मानसा या तीन जिल्ह्यांत होत आहे. प्रत्येक जिल्ह्यातील सहा याप्रमाणे तीन जिल्ह्यांतील १८ शेतकऱ्यांचा या प्रकल्पात सहभाग आहे. पंजाबमध्ये प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी झाल्यानंतर राजस्थान आणि हरियाना या राज्यात या प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाणार आहे.

काय आहे तंत्रज्ञान : फेरोमॅन ट्रॅप (कामगंध सापळे) मध्ये कॅमेरा लावण्यात आला आहे तो फोटो घेतो. त्यानंतर लर्निंग एल्गोरिदम या तंत्रज्ञानाचा उपयोग करून सापळ्यात फसलेली कीड नेमकी कोणती याचे पृथक्करण व मोजदाद होते. त्यानंतर ही माहिती शेतकरी, केंद्रीय कापूस संशोधन संस्था, कृषी विभाग तसेच पंजाब कृषी विद्यापीठ व तेथील कृषी विभागातील अधिकाऱ्यांच्या मोबाइलवर पोहोचविली जाते. त्याचे विश्लेषण करून नुकसान पातळीपेक्षा किडींचा प्रादुर्भाव अधिक असल्यास शेतकऱ्यांना नियंत्रण विषयक सल्ला तत्काळ दिला जातो.



# उसाच्या लागवडीसाठी सेंद्रिय कर्बाचे महत्त्व अधिक



केंद्र शासनाने प्रकाशित केलेल्या २०१५ च्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे अपेक्षित मूल्यमापनाबाबत निर्देशांकाची माहिती गेल्या काही भागात घेत आहोत. कारण केंद्र असो की राज्य शासन, आपल्या कोणत्या योजना आखतेवेळी त्यात काही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवत असते. त्याप्रमाणेच एकात्मिक व्यवस्थापन कार्यक्रमांची उद्दिष्टेदेखील शाश्वत विकासाच्या संकल्पनांशी निगडित अशी मांडलेली होती. त्यात नैसर्गिक साधनसंपत्तीच्या विकासाबरोबर लहान आणि अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांच्या विकासाचा विचार प्रकर्षाने केला होता.

भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने सन २०२२-२३ या वर्षी प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, एकात्मिक व्यवस्थापन कार्यक्रम टप्पा क्रमांक एक व प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना या माध्यमातून ३१ मार्च २०२२ अखेर देशातील एकूण ८,२१४ पाणलोट क्षेत्रांची निवड केली होती. पहिल्या टप्प्यामध्ये २००९-१० ते २०१४ -१५ या वर्षांपर्यंत २८ राज्ये व २ केंद्रशासित प्रदेशातील ३९.०७ दशलक्ष हेक्टर क्षेत्रावर पाणलोट संबंधी उपचार केले. त्यासाठी सुमारे ३३,६४२ कोटी रुपये खर्च केंद्र शासनाने केले. (एकूण खर्च केलेली रक्कम रु. ५०,७३९.५८ कोटी रुपये असून, त्यात केंद्र व राज्याच्या खर्चाची विभागणी ६०:४० टक्के या प्रमाणात आहे. पूर्वांचल व डोंगरी भागासाठी हे प्रमाण ९०: १० असे आहे). सुरुवातीपासून म्हणजेच २००९-१० पासून केंद्र शासनाने १९,९२७ कोटी रुपयांचा हिस्सा राज्यांना दिला आहे. उपचारासाठी निवडलेल्या एकूण पाणलोटांपैकी ६३०० पाणलोट पूर्णत्वास गेल्याचे राज्य सरकारांनी भूमी संसाधन विभागाला कळविले आहे.

सन २०१४ -१५ ते सन २०२१-२२ यादरम्यान प्राप्त माहितीनुसार उपचारीत पाणलोट क्षेत्रांमध्ये ७.६५ लाख इतके उपचार (सिमेंट / माती नाला बांध, नाला खोलीकरण, बांधबंधिस्ती, शेततळी, सलग समतल चर इ.) करण्यात आले आहेत, तर काही जुने उपचार पुनरुज्जीवित करण्यात आले आहेत. या प्रयत्नांमुळे झालेले बदल अहवालामध्ये नोंदवले आहेत. ते असे -

देशातील १६.४१ लाख हेक्टर क्षेत्र संरक्षित सिंचनाखाली आले असून, त्याचा फायदा ३६.३४ लाख शेतकऱ्यांना झाला. या कार्यक्रमांचे अंतरिम संनियंत्रण व मूल्यमापन अहवाल प्राप्त झाले आहेत. याशिवाय उपचारीत क्षेत्राचे १६.७५ लाख फोटो अक्षांश रेखांश सहित घेतल्याचेदेखील नमूद केले आहे. या मूल्यमापनामध्ये यामध्ये भौतिक व गुणात्मक स्तरावर पडताळणी केल्याबाबतचे नमूद केले आहे. केंद्र सरकारने हेच प्रकल्प पुढे दुसऱ्या टप्प्यांमध्ये राबविताना २०२१-२२ व २०२५-२६ या वर्षांपर्यंत आणखी ४.९५ दशलक्ष हेक्टर क्षेत्र व त्यासाठी केंद्र शासनाचा वाटा म्हणून रुपये ८१३४ कोटी मंजूर केले आहेत. या दुसऱ्या टप्प्यांमध्ये ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत २८० राज्यांमधील व २ केंद्रशासित प्रदेशामध्ये ११९० क्षेत्रामध्ये पाणलोटाचे उपचार केले. केंद्र शासनाने वरील नमूद क्षेत्रांसाठी रु. १५६८.३८ कोटी हा निधीही राज्यांना वितरित केल्याचे नमूद केले आहे. वरील नमूद प्रकल्पांच्या अंतरिम मूल्यमापनामध्ये कोणत्या घटकांच्या आधारे मूल्यमापन करावे, या संदर्भात केंद्र शासनानेच २०१५ मध्ये मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. या सूचनांनुसार अंतरिम मूल्यमापन होणे गरजेचे आहे. गेल्या भागापासून आपण शेती आणि फळबागांवर झालेल्या परिणामांची माहिती घेत आहोत. त्याबाबत पुढील ११ ते १५ क्रमांकाचे निर्देशांक तक्त्यामध्ये मांडले आहेत. भारतातील कृषी हवामानाशी निगडित प्रदेशांमध्ये उपचारीत पाणलोट क्षेत्रांमध्ये अपेक्षित बदल नोंदवतानाच निवडलेल्या प्रत्येक पाणलोटातील किमान २०० शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे आणि पाणलोट संदर्भात यशस्वी गावांना भेटी देण्यासाठी अभ्यास सहल किंवा क्षेत्रभेटीसंदर्भात सूचवले होते. त्यातील काही घटकातील बदल नोंदविण्यासाठी दर तीन आणि पाच वर्षांनी सर्वेक्षण घेऊन मूल्यमापनाचे अहवाल पाणलोट विकास पथक, तज्ज्ञ समिती, मूल्यमापन व संनियंत्रण यंत्रणांनी सादर करावेत असे सुचवले होते. म्हणजेच प्रत्यक्ष सर्वेक्षणातून पाणलोटातून झालेल्या गावकऱ्यामध्ये झालेल्या बदलांची खरी आकडेवारी मिळाली असती. याशिवाय वाढलेले यांत्रिकीकरण, साधनसंपत्ती संवर्धन, पीक पद्धतीतील बदल, उत्पादकतेमध्ये झालेली वाढ याबाबत प्रदेशनिहाय अपेक्षित बदल तक्त्यामध्ये दिलेले आहेत. २०१५ च्या मार्गदर्शक सूचनांमध्ये भौतिक, गुणात्मक पद्धती बरोबर संख्यात्मक पद्धतीने मूल्यमापन व्हावे असे नमूद केले आहे.

मात्र ग्रामीण विकास मंत्रालयाच्या अहवालामध्ये अंतिम मूल्यमापनामध्ये फक्त भौतिक व गुणात्मक पद्धतीने अहवाल प्राप्त झाल्याचे म्हटले आहे. त्यात संख्यात्मक बाबींचा उल्लेखही दिसत नाही. त्यामुळे उपरोक्त नमूद निर्देशांकाबाबत संनियंत्रण व मूल्यमापन यंत्रणांनी नेमके कोणत्या आधारावरती मूल्यमापन केले आहे याबाबत संदिग्धता आहे.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९१५ : पहिले महायुद्ध शॅम्पेनची दुसरी लढाई सुरू
१९१९ : रयत शिक्षण संस्थेची स्थापना झाली.
१९२९ : डॉ. जेम्स डूलिटिल यांनी संपूर्णपणे उपकरणांच्या साहाय्याने विमानाचे उड्डाण, प्रवास व लँडींग केले.
१९४१ : 'प्रभात'चा 'संत सखू' हा चित्रपट पुणे व मुंबई या दोन्ही ठिकाणी प्रदर्शित झाला.
१९५० : साली सयुक्त राष्ट्राने दक्षिण कोरियाची राजधानी सियोल ला आपल्या नियंत्रणात आणल.
१९६२ : अल्जीरिया प्रजासत्ताक झाले.
१९८१ : सांड्रा डे ओ'कॉनोर अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयातील सर्वप्रथम स्त्री न्यायाधीश झाली.
१९९९ : अवकाश शास्त्रज्ञ डॉ. कस्तुरीरंगन यांना एच. के. फिरोदिया पुरस्कार जाहीर.
१९९९ : रसायन शास्त्रज्ञ प्रा. एम. एस. शर्मा यांना एच. के. फिरोदिया पुरस्कार जाहीर.
१९९९ : डॉ. पाल रत्नासामी यांना एच. के. फिरोदिया पुरस्कार जाहीर.
२००३ : जपानच्या होक्काइदो शहराजवळ समुद्रात रिश्टर मापन पद्धतीनुसार ८.० तीव्रतेचा भूकंप.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६९४ : युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान हेन्री पेल्हाम यांचा जन्म.
१७११ : चिनी सम्राट कियान लाँग यांचा जन्म.
१८९९ : भारतीय कवी आणि गीतकार उदमुलाई नारायण कवी यांचा जन्म.
१९११ : त्रिनिदाद आणि टोबॅगो देशाचे पहिले पंतप्रधान एरिक विल्यम्स यांचा जन्म. (मृत्यू: १९ मार्च १९८१)
१९१६ : पण्डित दीनदयाळ उपाध्याय तत्त्वज्ञ, अर्थतज्ञ, समाजशास्त्री, इतिहासकार, पत्रकार, राजकीय नेते आणि जनसंघाचे एक संस्थापक (मृत्यू: ११ फेब्रुवारी १९६८)
१९२० : सतीश धवन इस्रोचे अध्यक्ष (मृत्यू: ३ जानेवारी २००२)
१९२२ : नौरूचे पहिले पंतप्रधान हॅमर डिरॉबुर्ट यांचा जन्म.
१९२२ : बॅ. नाथ पै स्वातंत्र्य सैनिक व घटनातज्ञ (मृत्यू: १७ जानेवारी १९७१ बेळगाव)
१९२५ : रघुनाथ विनायक हेरवाडकर बखर वाङ्मयकार (मृत्यू:)
१९२६ : बाळकृष्ण हरी तथा 'बाळ' कोल्हटकर नाटककार, कवी, अभिनेते, निर्माते, लेखक व दिग्दर्शक (मृत्यू: ३० जून १९९४)
१९२८ : माधव गडकरी पत्रकार (मृत्यू: १ जून २००६)
१९३२ : स्पेनचे पहिले पंतप्रधान एडॉल्फो साराझ यांचा जन्म. (मृत्यू: २३ मार्च २०१४)
१९३८ : ग्रीनलँडचे पहिले पंतप्रधान जोनाथन मोत्झफेल्ट यांचा जन्म.
१९३९ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते फिरोज खान यांचा जन्म. (मृत्यू: २७ एप्रिल २००९)
१९४० : भारतीय-इंग्लिश संशोधक, इतिहासकार, आणि लेखक टिम सेव्हरिन यांचा जन्म.
१९४६ : बिशन सिंग बेदी फिरकी गोलंदाज
१९५६ : साली अमेरिका आणि युरोप या राष्ट्रांमध्ये पहिली अंडर वाटर टेलिफोन सेवा सुरु झाली होती.
१९६९ : हॅन्सी क्रोनिए दक्षिण अफ्रिकेचा क्रिकेट कप्तान (मृत्यू: १ जून २००२)
१९९२ : साली अमेरिकन अंतराळ संस्था नासाने मंगळ ग्रहाचे पृष्ठभाग, वातावरण, हवामान आणि चुंबकीय क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी मार्स ऑब्जर्व्हर स्पेसक्राफ्ट, म्हणजेच मार्स जिओसायन्स / क्लायमेटोलॉजी ऑर्बिटर नावाचा रोबोट स्पेस प्रोब अवकाशात पाठवला.
२०१७ : साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री सहज बिजली हर घर योजना म्हणजेच 'सौभाग्य' योजनेची सुरुवात केली.
२०१७ : साली पश्चिम बंगाल येथील तृणमूल काँग्रेसचे वरिष्ठ नेता मुकुल रॉय यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१०६६ : नॉर्वेचा राजा हॅराल्ड (तिसरा) यांचे निधन.
१५०६ : कॅस्टिलचा राजा फिलिप (पहिला) यांचे निधन.
१६१७ : जपानी सम्राट गो-योझेई यांचे निधन.
१९१४ : साली भारतीय राजकारणी व भारताचे माजी सहावे उपपंतप्रधान चौधरी देवीलाल यांचा जन्मदिन.
१९५५ : साली जॉर्डन देशातील रॉयल जॉर्डनियन एअर फोर्स या वायुदलाची स्थापना करण्यात आली.
१९८३ : बेल्जियमचा राजा लिओपोल्ड (तिसरा) यांचे निधन.
१९८९ : साली भारतीय स्वातंत्रता सेनानी व साहित्यकार सुदर्शन सिंह चक्र यांचे निधन.
१९९० : पश्चिम बंगालचे तिसरे मुख्यमंत्री प्रफुल्लचंद्र सेन यांचे निधन. (जन्म: १० एप्रिल १८९७)
१९९८ : रंगकर्मी, दिग्दर्शक, निर्माते व लेखक कमलाकर सारंग यांचे निधन. (जन्म: २९ जून १९३४)
२००४ : अरुण बाळकृष्ण कोलटकर मराठी व इंग्रजी कवी (जन्म: १ नोव्हेंबर १९३२)
२०१० : साली पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भरतीय वरिष्ठ हिंदी पत्रकार, साहित्यकार, कवी व गीतकार तसचं, नवभारत टाइम्सचे भूतपूर्व वैशिष्ट्य संपादक कन्हैया लाल नंदन यांचे निधन
२०१३ : शं. ना. नवरे लेखक (जन्म: २१ नोव्हेंबर १९२७)

# जिल्हा परिषदेच्या शाळा टिकवण्यासाठी गुणवत्ता आवश्यक -सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कडा येथील स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्थेची सुवर्ण महोत्सवी वार्षिक सर्वसाधारण सभा आज होत आहे.या पतसंस्थेचा काटकसरीचा व्यवहार आहे.सभासदांच्या हिताचे विविध योजना व समाजोपयोगी उपक्रमही पतसंस्था राबविते.सुमारे पावणेदोन कोटी रुपये नफ्यात असलेली ही शिक्षकांची पतसंस्था आहे.एकुण ठेवी ४६ कोटी ७७ लाख असुन लवाकरच ९० कोटी ठेवी होवोत.अशा आमच्या शुभेच्छा आहेत परंतु वार्षिक सभेत शिक्षकांचे विविध प्रश्न अडी अडचणीवर चर्चा होते तशी शैक्षणिक गुणवत्तेवर चर्चा घडायला पाहिजे.कारण जि.प.च्या शाळा अडचणीत सापडु लागल्या आहेत. खेड्यापाड्यातुन स्कुल बसव्दारे शहरात मुले मुली जाऊ लागल्या आहेत.पालक आपले पाल्य इंग्रजी माध्यम असलेल्या शाळेत घालत आहेत.या समस्यावर एकच रामबाण उपाय आहे आणि तो म्हणजे शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे तरच पटसंख्या राहील अन्यथा जि.प.च्या शाळा बंद पडतील.जिल्हा परिषदेच्या शाळा टिकल्या पाहिजेत, त्यासाठी शिक्षकांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढवावी असे प्रतिपादन माजी मंत्री सुरेश धस यांनी केले.तसेच आ.बाळासाहेब आजबे बोलताना म्हणाले की, स्वामी विवेकानंद पतसंस्था ही मयत सभासदांच्या वारसाला २५ लाख रु अर्थिक मदत देते हे कार्य कौतुकस्पद आहे.जिल्हा परिषदेच्या शिक्षक हा शैक्षणिक गुणवत्ता देणारा आदर्श नागरिक, आदर्श विद्यार्थी घडविणारा असावा असे आवाहन आ.बाळासाहेब आजबे यांनी केले.

## मयत सभासदांच्या वारसाला २५ लाखाची मदत कौतुकास्पदच-आ.आजबे

सभासद कल्याण निधी उभारणीतून मयत सभासदांच्या वारसांस २५ लाख रुपयांची आर्थिक मदत,सर्व सभासदांना मोबाईल अँप्लीकेशनची सुविधा, चेक लेस बँकिंग, तात्काळ व सुलभ कर्ज,एस.एम.एस.बँकींग,कर्जासाठीची मुद्रांक सुविधा, दुरदृष्टी व पारदर्शकता,सी.बी.एस. सॉप्टवेअर प्रणाली, सभासदांना संस्थेकडे रक्कम भरणा करणेसाठी क्यु आर कोड सुविधा पतसंस्थेने संचालक व सभासद यांच्या सहकार्याने आपण दिली आहे. सभासदांची मागणी व संचालक मंडळाची अनुमती,पतसंस्थेचे आर्थिक हित या सर्व गोष्टींचा समन्वय साधून पतसंस्थेच्या कर्जावरील व्याजदर कमी करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

**– मारुती पठाडे, चेअरमन**

आष्टी तालुक्यातील कडा येथील स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्थेची ५० वी.वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२२ सप्टेंबर २०२४ रोजी रोजी खाकळवाडी येथील अंबिका लान्स मंगल कार्यालयात झाली.यावेळी माजी मंत्री सुरेश धसा,आ. बाळासाहेब आजबे , माजी आ.साहेबराव दरेकर, समाजसेवक विजय गोल्हार, उध्दवबापु दरेकर, तहसीलदार वैशाली पाटील, सभापती बद्रीनाथ जगताप, परमेश्वर काका शेळके, संदीप खकाळ,माजी सरपंच अनिलतात्या ढोबळे,गटशिक्षण अधिकारी सुधाकर यादव,दादासाहेब चितळे,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे,पत्रकार रघुनाथ कर्डीले,पत्रकार शरद तळेकर यांच्यासह प्रमुख मान्यवर, पदाधिकारी,पतसंस्थेचे अध्यक्ष,उपाध्यक्ष, सचिव,संचालक,शिक्षक आदी उपस्थित होते. यावेळी प्रस्ताविक चेअरमन मारुती पठाडे यिंनी कराताना सांगीतले की,आपण ३१ मार्च २०२४ अखेरचे वार्षिक हिशोब पत्रक सादर केलेले आहे.

या पतसंस्थेचे कार्यक्षेत्र हे जि.प.बीड अंतर्गत प्राथमिक व माध्यमिक शिक्षक आष्टी तालुका आहे.पतसंस्थेची सभासद संख्या एक हजार दोन ईतकी आहे.२६ कोटी १५ लाख ४५ हजार ०५९ भागभांडवल आहे, १८ कोटी ३ लाख ३६ हजार ५२५ शेअर्स आहे.८ कोटी १२ लाख ८ हजार ५३४ कायम ठेव आहे. २ कोटी ५२ लाख १९ हजार १९३ सभासद गंगाजळी आहे.४६ कोटी ७७ लाख ७० हजार ७४६ रु एकुण ठेवी आहेत.४२ कोटी ६८ लाख १६ हजार ३७८ मुदत ठेव आहे. ४ कोटी ९ लाख ५४ हजार ३६८ रु आवर्ती ठेव आहे.८३ कोटी ७७ लाख ३ हजार ४६७ रु सभासद एकुण कर्ज आहे.७९ कोटी ६० लाख ९३ हजार १९४ रु दिर्घ कर्ज आहे.२६ लाख ८९ हजार ४६४ रु तातडी कर्ज आहे.३ कोटी ४६ लाख ५९ हजार ७५९ रु मध्यम कर्ज आहे. ४२ लाख ६१ हजार ५० रु कर्मचारी कर्ज आहे.१ कोटी ८५ लाख ६२ हजार ६८८ रु पतसंस्थेला निव्वळ नफा आहे.१२ कोटी ८ लाख ४१ हजार ९३६ रु बँक गुंतवणुक आहे.८.५ टक्के सभासद कर्जावरील व्याजदर आहे.बँक कॅश क्रेडिट कर्जावरील व्याजदर ९ टक्के,कॅश क्रेडिट (एमजीबी बैंक) १५ कोटी रु आहे.याशिवाय सभासद कल्याण निधी उभारणीतून मयत सभासदांच्या वारसांस २५ लाख रुपयांची आर्थिक मदत केली जाते.सर्व सभासदांना मोबाईल अँप्लीकेशनची सुविधा उपलब्ध करुन दिली.एस.एम.एस. बँकींग केले आहे असे चेअरमन पठाडे यांनी यावेळी सांगीतले. यावेळी विशेष आदर्श शिक्षक, सेवानिवृत्त शिक्षक,पतसंस्थेने गौरवलेल्या उपक्रमशील शाळा, शिक्षण विस्तार अधिकारीपदी निवड , सेट नेट परिक्षा उतीर्ण,एम ए गोल्ह सेट मेडल,मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा विजेत्या शाळा,बीड जिल्हा स्काऊड गाइड आयुक्त निवड आदींचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी मंत्री सुरेश धस,आ. बाळासाहेब आजबे, माजी आ.साहेबराव दरेकर,तहसिलदार वैशाली पाटील,माजी सरपंच अनिलतात्या ढोबळे ,उध्दवबापु दरेकर,गटशिक्षण अधिकारी सुधाकर यादव यांची भाषणे झाली. ही वार्षिक सभा दोन सत्रात झाली. सभेच्या प्रारंभी पतसंस्थेच्या मान्यवरांच्या हस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.पतसंस्थेचे अध्यक्ष मारुती पठाडे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करुन विषयपत्रिकेनुसार वेगवेगळे विषय मांडले. या सर्व विषयांना अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात सभासदांनी मान्यता दिली.

यावेळी चेअरमन मारुती पठाडे,व्हाईस चेअरमन अशोक लटपटे,मानद सचिव महेश कुमार शिंदे, संचालक सर्वश्री विठ्ठल शिंदे,हिरामण पोकळे, संजय काळे,स्वानंद थोरवे,चंद्रशेखर खाडे, प्रविण मेहेरकर, रत्नाकर चव्हाण, महेशकुमार शिंदे, आप्पासाहेब काळे, नितीन करडुळे, आदिनाथ गर्जे,पोपट बोराडे,गोरक्ष गोरे, श्रीमती मनिषा होळकर – उडाणे,श्रीमती शैला सातपुते– पोकळे,ज्योती देसाई ,वैजिनाथ रायते,सर्व सभासद, शिक्षक शिक्षिका उपस्थित होते. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन शिक्षक बाळासाहेब तळेकर, शिक्षक मधुकर गळगटे, शिक्षक विकास धस यांनी केले.

---

# आरास स्पर्धा पुरस्कार वितरण सोहळा स्व.गोपीनाथ मुंडे सभागृहात घेणार -आ.मुंदडा



केज। प्रतिनिधी

केज शहरातही सांस्कृतिक चळवळ गतिमान व्हावी यासाठी आपण प्रयत्नशील आहोत येथील लोकांना आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध असून पुढच्या वर्षीचा गौरी – गणपती व महालक्ष्मी आरास बक्षीस वितरण सोहळा नव्याने होत असलेल्या लोकनेते स्व गोपीनाथ मुंडे सभागृहात घेऊ अशी ग्वाही आ नमिता मुंदडा यांनी दिली. वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने केज शहरासाठी आयोजित गौरी – गणपती व महालक्ष्मी आरास स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्याप्रसंगी शासकीय विश्रामगृहात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ नेते रणजितसिंह पाटील , पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन , नेताजी शिंदे , डॉ वासुदेव नेहरकर , महादेव सूर्यवंशी , विष्णू घुले , विकास मिरगणे , मधुकर सिरसट , श्रावण जाधव , अभय कुलकर्णी , रामदास तपसे , धनंजय कुलकर्णी , हनुमंत सौदागर , यांची उपस्थिती होती

पुढे बोलताना आ मुंदडा म्हणाल्या कि ; केज शहरात यावर्षी प्रथमच गौरी – गणपती व महालक्ष्मी आरास व देखावा स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले असतानाही महालक्ष्मी आरास स्पर्धेत चाळीस पेक्षा जास्त महिलांनी आपला सहभाग नोंदवला . त्यांनी यावेळी केलेल्या आरास या सामाजिक संदेश देणाऱ्या व कलात्मक होत्या तसेच गणेश मंडळांनी सादर केलेले देखावे देखील नागरिकांचे प्रबोधन व आपला सांस्कृतिक वारसा प्रगल्भ असल्याचे दर्शवणारी होती आजचा बक्षीस वितरण समारंभ शासकीय विश्रामगृहात होत असला तरी पुढील वर्षी होणार बक्षीस वितरण सोहळा आपल्या हक्काच्या म्हणजेच शहरात नव्याने होत असलेल्या लोकनेते स्व गोपीनाथ मुंडे सभागृहात घेऊ अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. गणेश मंडळांनी ईतर ठिकाणाहून देखावे आणून मोठेपणा न मिरवता स्व कल्पनेतून देखावे निर्माण करावेत व विशेषतः सजीव देखावे सादर करण्यावर भर द्यावा व आपल्या पुढच्या पिढीला समृद्ध वारसा देण्यासाठी व दिशा देणाऱ्या चाकोरीत काम करण्याची गरज असल्याचे परखड मत रणजितसिंह पाटील यांनी यावेळी व्यक्त केले यावेळी अनुक्रमे पहिल्या , दुसऱ्या व तिसऱ्या आलेल्या राजमुद्रा गणेश मंडळ , श्रीराम गणेश मंडळ , वक्रतुंड गणेश मंडळ व उत्तेजनार्थ चिंतामणी गणेश मंडळ , शिवसमर्थ गणेश मंडळ व शिवमल्हार गणेश मंडळ यांना रोख रक्कम , स्मृतिचिन्ह व शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.तसेच महालक्ष्मी आरास स्पर्धेत अनुक्रमे पहिल्या , दुसऱ्या व तिसऱ्या आलेल्या लाटे जयश्री , प्रीती कलढोणे व सुवर्णा सांगळे , वर्षा राख व भक्ती डापकर यांच्यासह उत्तेजनार्थ कानमोडे जयश्री , वैशाली चवरे , सुनीता शिंदे यांचा रोख रक्कम , स्मृतिचिन्ह व शाल देऊन सन्मान करण्यात आला कार्यक्रमाचे सुत्रसंचलन लक्ष्मण इनामदार गुरुजी यांनी केले तर आभार प्रदर्शन महादेव सूर्यवंशी यांनी केले.

# आंबेडकरी चळवळीतील अभ्यासू प्रा.वसंतराव कांबळे यांचे निधन

परळी। प्रतिनिधी



आंबेडकरी चळवळीतील अभ्यासू व्यक्तिमत्त्व व सामाजिक, राजकीय क्षेत्रातील प्रसिद्ध मिलिंद महाविद्यालयाचे प्रा. वसंतराव कांबळे सरांचे मंगळवार दि.२४ रोजी पहाटे हृदयविकाराने निधन झाले. वसंतराव कांबळे सर हे बौद्ध धम्मकार्यात सतत अग्रेसर असणारे, परळी शहरातील धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक,राजकीय,सांस्कृतिक,फुले शाहु आंबेडकर चळवळीत सक्रिय योगदान देणारे ते नेते होते.वसंतराव कांबळे सरांना मंगळवार दि.२४ रोजी पहाटे ३ वाजून ३० मिनिटांनी त्यांना माधवबाग येथील त्यांच्या घरी हृदयविकाराचा झटका आला. तात्काळ त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले परंतु उपचार दरम्यान त्यांचा मृत्यू झाला.आंबेडकरी चळवळीतील अनेक आंदोलनात, सामाजिक कार्यात ते नेहमी अग्रेसर असायचे.हरहुन्नरी नेतृत्व हरपल्याने सर्व क्षेत्रात दुःखाचे सावट व शोककळा पसरली आहे. दिवंगत वसंतराव कांबळे सरांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. दरम्यान प्रा. वसंत कांबळे यांच्यावर अंदाजे सायंकाळी ४ च्या सुमारास भीम नगर येथील शांतीवन स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येतील असे समजते.

# वडवणीत धनगर समाजाचे आरक्षणासाठी धरणे आंदोलन

वडवणी । प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्यातील धनगर समाजाचा एसटी आरक्षणामध्ये समावेश करून त्यांना तात्काळ प्रमाणपत्र देण्यात यावे या मागणीसाठी पंढरपूर येथे उपोषणाला बसलेल्या धनगर समाज बांधवांना पाठिंबा देण्यासाठी काल सोमवार रोजी वडवणी तहसील कार्यालयावर सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने मोर्चा काढून धरणे आंदोलन करण्यात आले.

इतर राज्यातील धनगड समाज हा एसटी आरक्षणामध्ये असून महाराष्ट्रातील ही धनगर आणि धनगड हे एकच असून त्यामुळे धनगर समाजालाही एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे यासाठी संपूर्ण महाराष्ट्र सह पंढरपूर येथे गेल्या बारा दिवसापासून धनगर समाज बांधव हे आमरण उपोषण आंदोलन करत आहे तरी याकडे राज्य सरकारने अद्यापही लक्ष दिलेले नसल्यामुळे धनगर समाज बांधवांमध्ये संतापाची लाट निर्माण झालेली आहे तरी याचे पडसाद वडवणीतही उमटल्याचे पहावयास मिळत असून काल सोमवार रोजी धनगर समाज बांधवांच्या वतीने तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढून धरणे आंदोलन करण्यात आले.

यावेळी धनगर समाजाचा एसटी प्रवर्गामध्ये समावेश करून तात्काळ प्रमाणपत्र देण्यात यावे असे लेखी निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले तरी वडवणी येथील या आंदोलनामध्ये हजारो सकल धनगर समाज बांधव सहभागी झाले होते. वडवणी येथे तहसील कार्यालया समोर धनगर समाजाचे आंदोलन सुरू असताना धनगर समाजाचे नेते दत्ता वाकसे यांनी आ.सोळंके यांना फोन करून धनगर समाजाचे आरक्षणा विषयी भुमिका स्पष्ट करण्यासाठी प्रतिक्रिया विचारली असता त्यांनी सांगितले की धनगर समाजाचे एस.टि.आरक्षणाला माझा शंभर टक्के पाठिंबा असुन याविषयी मी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांना लेखी पत्र देऊन कळविणार आहे असे सांगितले.

# कर्मचारी पतसंस्था कर्मचाऱ्यांसाठी मोठा आधार : डॉ.योगेश क्षीरसागर

बीड। प्रतिनिधी




बीड येथील नवगण, विनायक कर्मचारी सहकारी पतसंस्थेतचे कार्य उत्कृष्ट असून यामुळे कर्मचाऱ्यांना हक्काचा आधार ठरलेली आहे. यात वाढ करत संस्थेने कर्मचाऱ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात करावी, असे मत संस्थेचे सहसचिव तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले. बीड शहरातील नवगण, विनायक शिक्षण संस्थेची नवगण, विनायक कर्मचारी सहकारी पतसंस्थेची २७ वी सर्वसाधारण सभा रविवारी (दि.२२) सकाळी ११:३० वाजता शहरातील के.एस.के येथील स्पोर्ट्स सभागृहात पार पडली. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर हे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

सभेच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्षा तथा शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा प्रा.दीपा क्षीरसागर या होत्या. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर, नवगण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.किशोर काळे, संचालक आमेर सिद्दीकी, प्रशासक प्रा.सुधाकर गुट्टे, कार्यालयीन अधीक्षक व्ही.टी.देशमाने, पतसंस्थेचे अध्यक्ष बालासाहेब चवार, सचिव राजेंद्र कुर्हे, विना भोज, लिंबाजी उजगरे, सुनिल सपाटे, रमेश चौरे, सचिन पवार, श्रीहरी लहाने, रिझवान काझी, रमेश जाडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अध्यक्ष बालासाहेब चवार आणि संचालक मंडळाचे कौतुक केले. या कर्मचारी संस्थेमुळे कर्मचाऱ्यांना हक्काचा आधार मिळत असल्याचे म्हटले. कार्याचा आणखी विस्तार वाढवून बदलत्या काळानुसार विविध उपक्रम राबविण्यात यावेत, असे मत व्यक्त करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. तसेच, डॉ.दीपा क्षीरसागर यांनी अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले. या सर्वसाधारण सभेचे बालासाहेब चवार यांनी प्रास्ताविक करताना कामकाजावर प्रकाश टाकून वार्षिक अहवाल सादर केला. यावेळी सर्व मान्यवरांचे कर्मचारी संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला. सुत्रसंचलन शेख ताजुद्दीन यांनी केले. ही सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी सभासद, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बदलापूर आरोपीच्या एन्कॉंटरचे स्वागत : आमटे

बीड। प्रतिनिधी



लेकी बळीच्या अब्रूची लक्तरे वेशीला टांगणाऱ्या बदलापूर येथील आरोपी अक्षय शिंदे यांच्या एन्कंटर चे स्वागत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्र लेकी बाळा सुरक्षित नाहीत हे दुर्दैव छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात रांझ्या गावच्या पाटलाने एक अबला महिलेच्या अब्रूची लूटली छत्रपती शिवाजी रांझाच्या पाटलाने हातपाय कलम केले त्या नंतर स्वराज्यात कोणत्याही नारधामाची लेकी बळी कडे वाकडी नजर करून पाहण्याची हिम्मत झाली नाही. आज ही लेकी बळीच्या अब्रूला हात घालणाऱ्या नराधमाने एन्कंतर करण्यात यावे बदलापूर येथील आरोपीच्या एन्काऊंटर करणाऱ्या पोलिसाचे स्वागत असे पत्रका राजेंद्र आमटे यांच्या वतीने करण्यात येते आहे

---

# संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात थेटेगव्हाण ग्रामपंचायत जिल्ह्यात प्रथम

धारूर । प्रतिनिधी

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान २०२३-२४ या स्पर्धेत जिल्हाभरातील शेकडो ग्रामपंचायत नि सहभाग नोंदवला होता.धारूर तालुक्यातील थेटेगव्हाण ग्रामपंचायतने या स्पर्धेत आपला सहभाग नोंदवला होता.नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय तपासणी मध्ये जिल्हाभरातून थेटेगव्हाण ग्रामपंचायत प्रथम गुणांकासह संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात अव्वल आली आहे. थिटेगव्हाण चे सरपंच उपसरपंच ग्रामसेवक ग्रामपंचायत सदस्य आणि गावकऱ्यांना जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाबद्दल सर्व स्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.



सध्या अनेक ठिकाणी स्वच्छते अभावी रुग्णसंखेत वाढ होत आहे.अनेक ग्रामपंचायत मध्ये स्वच्छतेला विशेष महत्त्व दिले जात नसल्याने त्या त्या गावात प्रचंड मोठ्या प्रमाणावर रोगराई आणि दैनंदिन समस्या उद्भवत आहेत. यामुळे राज्य शासनाकडून संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान ही योजना राबवत ग्रामीण भाग स्वच्छ आणि समृद्ध करण्यासाठी शासन स्तरावरून प्रयत्न सुरू असतात. जिल्हाभरातील शेकडो ग्रामपंचायत या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवतात परंतु अंतिम स्पर्धेपर्यंत काही मोजक्याच ग्रामपंचायत या स्पर्धेत टिकून राहत यशस्वी होतात.याच पद्धतीने घेण्यात आलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान स्पर्धेत धारूर तालुक्यातील थेटेगव्हाण या ग्रामपंचायतने सहभाग घेतला होता.गावचे सरपंच भाऊसाहेब चव्हाण यांनी सर्व ग्रामपंचायत सदस्यांना गावकऱ्यांना विश्वासात घेऊन ग्राम स्वच्छतेचा विचार बोलून दाखवत ही स्पर्धा जिंकायची आहे आणि फक्त स्पर्धा जिंकायची नसून गावकऱ्यांच आरोग्य सुदृढ राहण्यासाठी प्रत्येक समस्येवर मात करण्यासाठी आरोग्य सक्षम असले पाहिजे त्यासाठी स्वच्छता महत्त्वाची असल्याचं गावकऱ्यांना पटवून दिले आणि या स्पर्धेत सहभाग नोंदवत अंतिम टप्प्यापर्यंत थेटेगव्हण ना ग्रामपंचायत या स्पर्धेत टिकून राहिली. नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या या जिल्हास्तरीय सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत निवडीमध्ये थेटेगावण ग्रामपंचायत ने जिल्हाभरात बाजी मरत अव्वल क्रमांक पटकावून संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सन २०२३-२४ या स्पर्धेची जिल्हास्तरीय तपासणी झाल्यानंतर विशेष पुरस्कार प्राप्त प्रथम द्वितीय आणि तृतीय ग्रामपंचायत निवडण्यात आल्या. यामध्ये थेटेगव्हाण ग्रामपंचायत ने प्रथम क्रमांक पटकावल्याने सर्व स्तरातून सरपंच भाऊसाहेब चव्हाण तसेच गावकऱ्यांवर शुभेच्छा दिल्या जात आहेत.ही योजना यशस्वी करण्यासाठी सरपंच भाऊसाहेब चव्हाण,ग्रामसेवक प्रीती शिंदे, उपसरपंच, ग्रामपंचायत सर्व सदस्य गावकरी यांनी परिश्रम घेतले. या स्पर्धेचे नियम आणि महत्व समजावून सांगण्यासाठी गटविकास अधिकारी संतोष वंगवडे तसेच विस्तार अधिकारी जिल्हा परिषदेतील अधिकारी कर्मचारी यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.

# संभाजीनगर येथे माजी सैनिकांच्या पेन्शन संबंधित मेळाव्याचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

संभाजीनगर व मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील माजी सैनिक पेन्शन व स्पर्श संबंधी असलेल्या अडचणी चे निवारण करण्यासाठी दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी मराठवाडा विभागातील सर्व माजी सैनिक ,वीर नारी, वीर पिता ,वीरमाता ,व सर्व वयोवृद्ध सैनिकांकरिता ९७ आर्टिलरी ब्रिगेड येथील सर्वत्रा ऑडिटोरियम छावणी येथे सकाळी नऊ ते संध्याकाळी सहा या वेळेत मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. पेन्शन व स्पर्श संबंधी सैनिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. मराठवाड्यातील संभाजीनगर, जालना, बीड ,परभणी ,हिंगोली, नांदेड, लातूर ,धाराशिव या जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक वीर नारी वीर माता-पिता व वयोवृद्ध सैनिकांसाठी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे या मेळाव्यात पेन्शन व स्पर्श संबंधी व अन्य अडचणीचे निरासन करण्याकरिता प्रधान नियंत्रण रक्षा लेखा कार्यालय पुणे येथील प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

वन रँक वन पेन्शन व अन्य शासकीय योजना बाबत माहिती व मार्गदर्शन प्रधान नियंत्रक रक्षा लेखा कार्यालय पुणे येथील प्रतिनिधी मार्फत करण्यात येणार आहे. ज्या माजी सैनिकांना किंवा त्यांच्या कुटुंबीयांना पेन्शन व स्पर्श संबंधी अडचणी असतील त्यांनी येताना पेन्शन संबंधी सर्व मूळ कागदपत्रे व अडचणी संबंधातील हिंदी किंवा इंग्रजी मध्ये तीन प्रतीत अर्ज घेऊन यावा. ज्या माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांना लिहिणे बोलणे व आपली बाजू मांडणे शक्य नाही त्यांनी त्यांच्या कुटुंबातील योग्य व्यक्तीस सोबत आणावे म्हणजे प्रतिनिधी प्रधान नियंत्रण रक्षा लेखा कार्यालयाच्या प्रतिनिधी सोबत आपली बाजू मांडू शकेल .त्यामुळे त्यांचे निरासन करण्यास मदत होईल. सदर मेळाव्यास येणाऱ्या सर्व माजी सैनिकांकरिता मध्यवर्ती बस स्थानक, सिडको बस स्थानक व रेल्वे स्टेशन ते ९७ आर्टिलरी ब्रिगेड सर्वत्रा अडॉटोरीयम छावणी छत्रपती संभाजीनगर पर्यंत जाण्या-येण्याकरिता सैनिकी परिवहनाची तसेच चहा पान व दुपारी भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे तरी सर्व माजी सैनिकांनी व कुटुंबीयांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे व या मेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन ब्रिगेड कमांडर ९७ ब्रिगेड व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# आवरगावला संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता राज्यस्तरीय विशेष पुरस्कार

## पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील, मंत्री अब्दुल सत्तार माजी मंत्री भागवतराव कराड, सहकारमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील आवरगाव ग्रामपंचायतला राज्य शासनाचा संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, मंत्री अब्दुल सत्तार, माजी मंत्री भागवतराव कराड, सहकार मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते देण्यात आला.हा पुरस्कार आवरगावचे सरपंच अमोल जगताप, ग्रामसेवक व ग्रामस्थांनी स्वीकारला .राज्यस्तरीय विशेष पुरस्कार प्राप्त करणारी सावरगाव ही पहिली ग्रामपंचायत ठरली.

बीड जिल्ह्यातील संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत जिल्ह्यातील ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली. राज्यस्तरीय टीमने जिल्ह्यातील ग्रामपंचायतीची तपासणी केल्यानंतर सावरगाव ही ग्रामपंचायत अव्वल नंबर ठरली. सावरगाव च्या सरपंचांनी ग्रामपंचायत, क्रीडांगण, अंगणवाडी, बालवाडी, मंदिर प्राथमिक शाळा या सार्वजनिक ठिकाणच्या स्वच्छतेबरोबरच गावातील रस्त्याची आणि प्रत्येक घराची स्वच्छता करण्याची लोकांना सवय लावली.

### उत्तम कचरा व्यवस्थापन

या गावांमध्ये प्रत्येक ठिकाणी कुंड्या ठेवलेल्या असून गावातील सर्व कचरा गोळा करून यात टाकला जातो. या कचऱ्यापासून खत निर्मितीसाठी ग्रामपंचायतचे प्रयत्न असतात. हे खत शेतात टाकून गावाच्या उत्पन्न वाढीसाठीही मदत होते.

या ठिकाणी घनकचरा व्यवस्थापनाचे काम उत्तम झाले असून या गावातील थेंबभरही सांडपाणी बाहेर जात नाही. त्यामुळे गावात घाण होत नाही. आणि त्यामुळे शंभर टक्के डास निर्मूलन झाले. रोगराई पासून मुक्ती मिळाली. या सर्व बाबींची सवय ग्रामस्थांना लागल्याने हे गाव आदर्श ठरले. सरपंच अमोल जगताप ,ग्रामसेवक आणि ग्रामस्थांनी मिळून गावची स्वच्छता कायम ठेवल्याने आणि शौचालयाचा शंभर टक्के वापर चालू असल्याने या गावाला पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार मंत्री महोदयांच्या हस्ते गावचे सरपंच अमोल जगताप, ग्रामसेवक आणि ग्रामस्थांनी स्वीकारला.या पुरस्काराबद्दल गावचे सरपंच ग्रामसेवक आणि ग्रामस्थांचे जिल्ह्यातून अभिनंदन होत आहे.





### शौचालयाचा शंभर टक्के वापर

या गावांमध्ये सार्वजनिक शौचालय सोबतच प्रत्येक घरामध्ये शौचालयाचा शंभर टक्के वापर होतो. अगदी लहान मुलेही रस्त्यावर शौचास बसत नाहीत .तर ते आपल्या शौचालयात बसतात. त्यामुळे रस्त्यावर कुठेही घाण होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. प्रत्येक जण आपली जबाबदारी ओळखून आपले गाव स्वच्छ असले पाहिजे आणि त्यामुळे आपले आरोग्य चांगले राहण्यासाठी मदत होईल. याची सर्वांना जाणीव झाल्याने प्रत्येक जण आपले गाव स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न करत असतो. गावाच्या सहकार्यामुळेच राज्यस्तरीय पुरस्कार मिळणे शक्य झाले असे सरपंच अमोल जगताप सांगतात.

### गावातील प्रत्येकाला शिस्त

सावरगाव येथील प्रत्येक व्यक्तीला स्वच्छतेची शिस्त लागली असून कोणीही रस्त्यावर कचरा टाकत नाही .आपले अंगण आणि रस्ता स्वच्छ केला जातो कचरा हा कचरा कुंडीतच टाकला जातो. तसेच रस्त्यावर सांडपाणी कोणीही टाकत नाही त्यामुळे रस्त्यावर कुठेही घाण दिसत नाही गावात गेल्यानंतर प्रसन्न वाटते.

### मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड

गावामध्ये रस्त्या रस्त्यावर आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली असल्याने आणि त्याचे संगोपन केल्याने ही झाडे आता बऱ्यापैकी वाढलेली आहेत .त्यामुळे गाव हे हिरवेगार दिसते. सार्वजनिक ठिकाणाबरोबरच नागरिकांनी आपापल्या दारामध्ये झाडे लावून त्याचे संगोपन केलेले आहे .

# राज्यात प्रथमच बाल दिव्यांग महोत्सव

## बीडमधून ५ ऑक्टोबरला शुभारंभ; बालरंगभूमी परिषदेचा स्तुत्य उपक्रम

बीड । प्रतिनिधी

येथील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची घटक संस्था बालरंगभूमी परिषद प्रत्येक जिल्हास्तरावर दिव्यांग महोत्सव घेणार आहे. ५ ऑक्टोबरला बीड दिव्यांग महोत्सवापासून याची सुरूवात होणार असल्याची माहिती बीड शाखेच्या अध्यक्ष तथा बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी दिली आहे.

बालरंगभूमी परिषद आपल्या व्याप्तीनुसार मुलांच्या सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने कार्य करत असताना विशेष मुलांना सुध्दा व्यासपीठ उपलब्ध






व्हावे. त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव, प्रोत्साहन देवून त्यांना सक्षम मुलांच्या प्रवाहात आणण्यासाठी 'यहाँ के हम सिंकदर' हा विशेष मुलांच्या कलागुण सादरीकरणाचा एक प्रयत्न आहे. शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या परिसरात दि.५ ऑक्टोबर रोजी सकाळपासून सुरू होणार्या महोत्सवात बीड जिल्ह्यातील जवळपास २५ दिव्यांग शाळांचा सहभाग असणार आहे. यात कर्णबधीर, मुकबधीर, अंध, मतिमंद, अस्थिव्यंग अशा अनुदानित, विनाअनुदानीत शाळांचा सहभाग घेता येणार आहे. अंदाजे २०० विद्यार्थी सहभागी होतील. विशेष मुलांच्या गुण कौशल्याचे कौतुक करणारा हा महोत्सव असून ही स्पर्धा नाही. यात नाटक, नक्कला, गाणे, नृत्य, रांगोळी, चित्र योगा, वाद्यवाजवणे, शिल्पकला यातील कोणतीही कला हे विशेष मुले करू शकतात. महोत्सवाच्या ठिकाणी या मुलांनी बनवलेल्या वस्तुचे प्रदर्शन व विक्रीसाठी ठेवता येणार आहे. महाराष्ट्रात बीड जिल्ह्यातून या महोत्सवाला सुरूवात होत असून जास्तीत जास्त संख्येने दिव्यांग शाळा, विद्यालये, संस्था, शिक्षक, विद्यार्थ्यांनी यात सहभाग घ्यावा असे आवाहन बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष निलम शिर्के सामंत, उपाध्यक्ष डॉ.दीपा क्षीरसागर, ◀◀ पान ३ वर

# नवीन धोरण ठरवताना चर्चा घडवून आणणे स्तुत्य उपक्रम –आ.प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात दि २३ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत संभाजीनगर सह अनेक महाविद्यालयाने सहभाग घेतला.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयात सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त '' नवीन शैक्षणिक धोरणाने उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारेल का/ नाही'' या विषयावर राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेच्या उद्धाटनपर कार्यक्रमाचे अध्यक्ष म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके होते.तर स्पर्धेचे




उद्धाटन महाविद्यालय विकास समिती सदस्य ॲड.भानुदासराव डक यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ.जी.के. सानप,उपप्राचार्य डॉ.एम. ए.कव्हळे, उपप्राचार्य डॉ. एन.के. मुळे,प्रा.बालाजी बोडके,प्रशांत चव्हाण, सतीश एरंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना आ. प्रकाश सोळंके म्हणाले की, एखादे नविन धोरण ठरवत असताना त्याविषयी समाजात चर्चा घडवून आणणे हे महत्त्वाचे आहे.त्या दृष्टिकोनातून सुंदरराव सोळंके महाविद्यालयात नवीन राष्ट्रीय धोरणाविषयी स्पर्धेच्या माध्यमातून चर्चा घडवून आणली जात आहे हे स्तुत्य आहे.

राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर सह अन्य जिल्ह्यातून स्पर्धक सहभागी झाले. यामध्ये माणिकचंद पहाडी विधी महाविद्यालय संभाजीनगर (प्रथम), श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव( द्वितीय), तर राजमाता जिजाऊ महाविद्यालय धारूर (तृतीय ) या महाविद्यालयाने पारितोषिक पटकावले.स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ.रामहरी मायकर, डॉ.रिंगणे, प्रा. भरत खेत्री यांनी केले. प्रस्ताविक प्राचार्य डॉ. जी.के. सानप यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.ज्ञानेश्वर कुंडकर यांनी केले तर आभार प्रा. बालाजी बोडके यांनी मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा डॉ ज्ञानेश्वर शिंदे,प्रा.डॉ. गणेश मोकासरे,प्रा.डॉ.अरुण पेंटावार,प्रा. सुदर्शन स्वामी, प्रा. प्रकाश शिंदे, प्रा.सिद्धेश्वर कदम यांनी परिश्रम घेतले.

# ८१ व्या मसाप वर्धापन कवी संमेलन अध्यक्षपदी कवी सय्यद अल्लाउद्दीन

बीड । प्रतिनिधी



रविवार दि.२९ सप्टेंबर २०२४ रोजी मराठवाडा साहित्य परिषदेच्या ८१ व्या वर्धापन दिनानिमित्त बीड येथे होणाऱ्या कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी सय्यद अल्लाउद्दीन यांची निवड करण्यात आली आहे.दुपारी २ ते ५ या वेळेत,सामाजिक न्याय भवन,शासकीय विश्रामगृह समोर,बीड येथे होणाऱ्या या कवी संमेलनात दिग्गज मान्यवर आणि नवोदित कवी,कवयित्रींना निमंत्रित करण्यात आले आहे.सकाळी १० वाजता होणाऱ्या उद्धाटन सोहळ्याला अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील,प्रमुख पाहुणे ज्येष्ठ नाटककार अजित दळवी,मसाप बीड जिल्हाध्यक्ष सतीश साळुंके,सह सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.रेखा ढेरे या सूत्रसंचालन करणार आहेत.

# वीज पडून चार शेळ्यांचा मृत्यू

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील देवळाग्रामपंचायत अंतर्गत खंडोबाची वाडी येथील एका अल्पभूधारक शेतकऱ्याच्या ४ शेळ्या वीज पडून मृत्यू झाल्याची घटना रविवार दि २२ रोजी दुपारी ४ : ३० वाजेच्या दरम्यान घटना घडली आहे. आसल्याची माहिती वडवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांनी दिली आहे.



सविस्तर वृत्त असे की गेली दोन दिवस झालं वडवणी तालुक्यात मेघर्जनेसह पावसाने सुरुवात केली आहे.काल रविवार दिनांक २२ रोजी देवळा ग्रामपंचायत अंतर्गत खंडोबाचीवाडी येथील अल्पभूधारक शेतकरी नानासाहेब कल्याण पेजगुडे वय ३३ वर्ष रा.खंडोबाचीवाडी हे गावाशेजारील आसलेल्या कानिफनाथ मंदिरा सेजारी शेळ्या चारत असतांना दुपारी ४:३० वाजेच्या दरम्यान अचानक विजांच्या कडकडाटासह पावसात सुरुवात झाली.त्या ठिकाणी अचानक वीज कोसळून चार शेळ्यांचा मृत्यू झाला असल्याने शेतकऱ्यांचे हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.पंचनामा करून शेतकऱ्या आर्थिक मदत देण्याची मागणी केली जात आहे.

# जयसिंह सोळंके यांनी दिला धनगर एसटी आरक्षणासाठी जाहीर पाठिंबा

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यामध्ये सध्या धनगर समाज एसटी आरक्षणाच्या प्रश्नासाठी, पंढरपूर या ठिकाणी धनगर समाजाचे सहा मावळे उपोषणाला बसले आहेत, यामध्ये माऊली हळनवर, दीपक बोराडे गणेश केसकर, योगेश धरमे, विजय तमनर, यशवंत गायके बीड,हे समाज बांधव पंढरपूर या ठिकाणी धनगर समाज एसटी आरक्षणासाठी उपोषणाला बसले आहेत, गेल्या अकरा दिवसापासून हे उपोषण पंढरपूर या ठिकाणी चालू आहे, या उपोषणाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते जयसिंह सोळंके यांनी धनगर समाज एसटी आरक्षण साठी



पाठिंबा दिला, माजलगाव विधानसभा मतदारसंघातील धनगर समाजाचे युवा नेतृत्व आनंद काळे यांच्या नेतृत्वाखाली वडवणी तालुक्यातील धनगर समाज बांधव पंढरपूरकडे एसटी आरक्षणाच्या आंदोलनासाठी पाठिंबा देण्यासाठी रवाना झाले आहेत, यावेळी धनगर समाज राज्याचे नेते दत्ता वाकसे, पत्रकार अंकुश गवळी, दिनेश नेमाटे, संतोष वरकटे, जगन्नाथ थोरात ,संतोष आजबे , संदीप माने योगेश आजबे व अन्य काय मराठा समाज बांधव यांनी धनगर समाजाच्या एसटी आरक्षणासाठी पंढरपूर या ठिकाणी वडवणी तालुक्यातील आले होते ,आदी धनगर समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते,

# अंबाजोगाईची होतेयं अधोगती, विकासांच्या प्रश्नांना बगल, केवळ निवेदनावरचं लोकप्रतिनिधींचं राजकारण

## अंबाजोगाई जिल्हा निर्मिती, 'एमआयडीसी', टेक्स्टाईल पार्क, बुटेनाथ तलावासह अनेक मुद्यांकडे दुर्लक्ष

अंबाजोगाई प्रतिनिधी

मराठवाडा मुक्तीसंग्राम चळवळीचे प्रमुख केंद्र असलेल्या अंबाजोगाई शहराची अधोगतीकडे वाटचाल सुरु आहे. गेल्या कित्येक वर्षांच्या कालखंडात अंबाजोगाईचे विकासाचे प्रश्न 'जैसे थे' चं असून ते सोडविण्यात लोकप्रतिनिधींना अपयश आले आहे. केवळ निवेदनावरचं लोकप्रतिनिधींचे राजकारण सुरु असल्याने अंबाजोगाईच्या विकासाच्या मुद्द्यांकडे दुर्लक्ष होत आहे. लोकप्रतिनिधींनी आता तरी अंबाजोगाईच्या विकासाच्या प्रश्नाला हात घालत ते सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी सामान्य जनतेतून




होत आहे.

मराठवाड्यातील एक सुसंस्कृत शहर म्हणून अंबाजोगाईची ओळख आहे. या शहरातील जनता भावनिक, आध्यात्मिक आणि संवेदनशील आहे. अंबाजोगाईकरांच्या याच गुणांचा फायदा घेत राजकारण्यांनी या शहराला विकासापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. अंबाजोगाईच्या नंतर उदयास आलेल्या शहरांचा झपाट्याने विकास झाला आहे. काही शहरांना तर न मागता विकासाचे प्रकल्प मिळाले आहेत. परंतू, अंबाजोगाईकरांना मात्र केवळ आश्वासनावरचं समाधान मानावे लागत आहे.

### बीड जिल्ह्यात दोन 'एमआयडीसी' ला मंजुरी

बीड जिल्ह्यात दोन 'एमआयडीसी' ला मंजुरी देण्यात आली. जिल्ह्यातील आष्टी आणि परळी तालुक्यात या 'एमआयडीसी' होणार आहेत. परंतू, अंबाजोगाईकरांची 'एमआयडीसी' ची मागणी जुनी असतानाही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे अंबाजोगाईच्या जनतेची घोर निराशा झाली आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत लोकप्रतिनिधींना जनता जाब विचारल्याशिवाय राहणार नाही, हे मात्र निश्चित आहे.

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधून छत्रपती संभाजीनगर येथे नुकतेच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी मराठवाड्याच्या विकासासाठी कटीबद्ध असल्याचे सांगितले. पण गेल्या काही वर्षांत मराठवाडा मुक्ती संग्रामातील चळवळीचे प्रमुख केंद्र असलेल्या अंबाजोगाईच्या वाट्याला फार काही मिळाले नाही, हे लोकप्रतिनिधींचे अपयशचं म्हणावे लागेल. अंबाजोगाई जिल्हा निर्मिती, 'एमआयडीसी' टेक्सटाईल पार्क, बुटेनाथ तलाव यासह अन्य विकासाचे मुद्दे केवळ कागदावरचं राहिले आहेत.

# आरक्षण हक्क परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहून इतिहासाचे साक्षीदार व्हा - विजय साळवे

माजलगाव । प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या ६८ व्या वर्धापन दिनानिमित्त आरक्षण हक्क परिषदेचे आयोजन करण्यात आले असुन बीड जिल्ह्यातील तमाम संविधान प्रेमी जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विजय साळवे यांनी केले आहे.



विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ३० सप्टेंबर १९५६ दिनी दिल्ली या ठिकानी शेड्युल कास्ट ऑफ फेडरेशन हा पक्ष बरखास्त करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाची स्थापना झाली असे जाहिर केले होते. त्या अनुषंगाने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या ६८ व्या वर्धापन दिनानिमित्त बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील वैष्णवी मंगल कार्यालय येथे आरक्षण हक्क परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेचे औचित्य साधून डॉ. राजरत्न आंबेडकर हे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची घोषणा करणार आहेत प्रसंगी विजय साळवे यांची स्वाभिमानी रिपब्लिकन सेना बरखास्त करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षामध्ये विलिन करणार आहेत.

या ऐतीहासीक आरक्षण हक्क परीषदे प्रमुख मार्गदर्शक म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे राष्ट्रीय अध्यक्ष मा. डॉ. राजरत्न आंबेडकर यांची उपस्थिती राहणार असुन कार्यक्रमाचे उद्धाटक म्हणून संघर्ष योद्धा मा. मनोजदादा जरांगे पाटिल तर प्रमुख वक्ते म्हणून मुस्लिम लॉ बोर्डचे केंद्रिय सदस्य मा. मौलाना अबु तालिब रेहमानी आदि मान्यवर परिषदेस संबोधित करणार असुन या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्वाभिमानी नेते विजयदादा साळवे भूषविणार आहेत.

या परिषदेला प्रमुख पाहुणे म्हणून रिपाईचे प्रदेशाध्यक्ष दिनेश हनुमंते , उद्योजक तथा संपादक विजयकुमार वाव्हळ , वैभव धबडगे , सिद्धार्थ गायकवाड , ॲड रामजी कांबळे , ऋषिकेश बेद्रे , चंद्रकांत शेजूळ , अप्पासाहेब जाधव , राजेश साळवे , शेख मंजूर , बी.जी. शिंदे , सोमनाथ चांदमारे , अंजेराम घनघाव , पंडित ओव्हाळ , राजेश घोडे , आशोक डोणे , शेख मजहर , अशोक मगर यांची उपस्थिती राहणार आहे. ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# भामा आसखेड धरण पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतिपथावर

**पुणे । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरामध्ये वाढते औद्योगीकरण, नागरीकरण व वाढत्या शहरीकरणामुळे लोकसंख्या वाढत आहे. त्यासाठी भामा आसखेड धरणातून अतिरिक्त पाणी घेतले जाणार आहे. या पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतिपथावर आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील आधुनिक सोयी-सुविधांमुळे शहरामध्ये वास्तव्य करण्यासाठी नागरिकांचा कल वाढल्यामुळे येथील नागरिकांच्या पिण्याच्या पाणीक्षमतेमध्ये वाढ करणे क्रमप्राप्त ठरले आहे. यासाठीच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने भामा आसखेड धरण पाणीपुरवठा योजनेमध्ये अंतर्भाव असलेले विविध प्रकल्प जसे की, अशुद्ध जल उपसा केंद्र, १७०० मिलिमीटर व्यासाची ७.३० कि.मी असलेली रायझिंग मेन, ब्रेक प्रेशर टँकची बांधणी, १४०० मि.मी. व्यासाची १८.८० किलोमीटरची ग्रॅव्हिटी मेन जलवाहिनी, चिखली येथील नियोजित २०० द.ल.लि. क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र अशा प्रकल्पांचे काम प्रगतिपथावर असून या माध्यमातून शहरास वाढत्या लोकसंख्येचा विचार करता मुबलक पाणी मिळणार आहे. असे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

अशुद्ध जलउपसा केंद्राचे ६५ टक्के काम पूर्णत्वास

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने मंजुरी दिलेल्या अशुद्ध उपसा केंद्र मौजे वाकी तर्फे वाडा येथे बांधण्याचे काम ६५ टक्के पूर्ण झाले आहे. अशुद्ध उपसा केंद्राच्या माध्यमातून शहरासाठी प्रतिदिन १६७



द.ल.लि. इतके पाणी उपलब्ध होणार असून उर्वरित काम प्रगतिपथावर असल्याचे पाणीपुरवठा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

२.८० किमी लांब १७००.मि.मी. व्यासाची रायझिंग मेन जलवाहिनी पूर्ण

मौजे वाकी तर्फे वाडा येथील अशुद्ध जल उपसा केंद्रापासून ते मौजे तळेगाव येथील ब्रेक प्रेशर टँक पर्यंत ७.३० किलोमीटरची १७०० मि.मी. व्यासाची रायझिंग मेन जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. त्यापैकी, २.८० किलोमीटर लांबीची जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्णत्वास आले आहे. याबरोबरच, उर्वरित जलवाहिनीच्या कामाची कार्यवाही सुरू असून उर्वरित काम प्रगतिपथावर आहे.

ब्रेक प्रेशर टँक बांधणीपूर्वीचे आवश्यक काम पूर्ण

भामा आसखेड अशुद्ध जलउपसा केंद्रातून पाणी उपसा करून १७०० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीमधून मौजे तळेगाव येथील नियोजित ब्रेक प्रेशर टँकपर्यंत आणण्यात येणार आहे. नियोजित ब्रेक प्रेशर टँक बांधणीपूर्वीचे अत्यावश्यक काम जसे की, माती परीक्षण, जीऐ ड्रॉईंग, स्ट्रक्चरल डिझाईन ड्रॉईंग आदी कामे पूर्णत्वास आली असून नजीकच्या काळात प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होणार आहे.

८.४० किमीची ग्रॅव्हिटी मेन जलवाहिनी पूर्ण

तळेगाव येथील ब्रेक प्रेशर टँक पासून चिखली जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी नेण्यासाठी १८.८० किलोमीटर लांबीची १४०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. त्यानंतर ते पाणी चिखली जलशुद्धीकरण केंद्रामध्ये शुद्ध करून पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना उपलब्ध करून दिले जाणार आहे. एकूण १८.८० किलोमीटर जलवाहिनीच्या लांबीपैकी ८.४० किलोमीटर लांबीची जलवाहिनी टाकण्यात आली आहे. त्याबरोबरच, भामा आसखेड धरणातून मिळणाऱ्या १६७ द.ल.लि. पाण्यासाठी नियोजित २०० द.ल.लि. प्रतिदिनी क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र चिखली येथे बांधण्याचे काम सुरू असून हायड्रॉलिक, जीऐ ड्रॉईंग, स्ट्रक्चरल डिझाईन ड्रॉईंग तपासून घेण्याचे काम सुरू आहे.

नागरिकांना मुबलक पाणी देण्यासाठी महापालिका सदैव तत्पर!

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील नागरिकांना मुबलक पाणी मिळावे यासाठी महापालिकेकडून विविध प्रकल्पाची उभारणी करण्यात येत आहे. भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेच्या प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर असून नियोजित वेळेपर्यंत प्रकल्प पूर्ण होऊन नागरिकांना मुबलक पाणी मिळणार आहे. नागरिकांना मुबलक पाणी देण्यासाठी महापालिका सदैव तत्पर असून प्रकल्पाचे काम जलद गतीने सुरू आहे.

शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेचे प्रकल्प नियोजित वेळेत पूर्णत्वास

भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेमधील अशुद्ध जलउपसा केंद्राचे काम ६५ टक्के पूर्ण झाले असून काही प्रकल्पाचे कामही जलद गतीने सुरू आहे. शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत असून प्रकल्प पूर्ण होण्यासाठी असणाऱ्या नियोजित वेळेमध्ये योजनेतील विविध प्रकल्प पूर्ण होणार आहेत. त्यासाठी महापालिकेकडून वेळोवेळी पाठपुरावाही करण्यात येत आहे.

प्रदीप जांभळे-पाटील
अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

# भाजपच्या भोसरी आणि चिंचवड मतदारसंघावर अजित पवार गटाचा दावा, शीतयुद्ध पेटणार?

**पुणे । प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीच्या प्रमुख नेत्यांच्या पडद्यामागे बैठका पार पडत आहेत. कोणता पक्ष कुठल्या आणि किती जागांवर लढेल? याबाबत या बैठकींमध्ये ठरवलं जात आहे. असं असताना काही मतदारसंघांमध्ये महायुतीच्या घटक पक्षांमध्ये जागावाटपावरुन रस्सीखेच होताना बघायला मिळत आहे. भाजपच्या पुणे जिल्ह्यातील दोन जागांवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून दावा करण्यात आला आहे. राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांची आज नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून तसा ठराव करण्यात आला आहे.

भाजपच्या भोसरी आणि चिंचवड मतदारसंघावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षाकडून दावा करण्यात आला आहे. पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे यांनी बैठक घेत याबाबत दावा केला. अण्णा बनसोडे यांच्याकडून पिंपरी मतदारसंघावर दावा करण्यात आल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. सध्या भोसरीतून भाजपचे महेश लांडगे हे आमदार आहेत. तर चिंचवडमधून



भाजपच्या अश्विनी जगताप या आमदार आहेत.

अजित पवार गटाचा भाजपला इशारा

पिंपरी चिंचवडमध्ये भाजपनंतर अजित पवार गटाने नवा ठराव मंजूर केलाय. भाजपने बैठक घेऊन पिंपरी विधानसभेवर दावा केला. त्यानंतर आज अजित पवार गटाने ही बैठक घेतली आणि भाजपच्या वाट्याला असणाऱ्या भोसरी-चिंचवड राष्ट्रवादीला घेण्याचा ठराव मंजूर केला. तसेच भाजप राष्ट्रवादीचा प्रचार करणार नसेल तर आम्ही भोसरी आणि चिंचवडमध्येही प्रचार न करण्याचा निर्णय घेऊ शकतो, असा इशाराही द्यायला अजित पवार गट विसरला नाही. या बैठकीत अजित पवार गटाचे आमदार अण्णा बनसोडे स्वतः उपस्थित होते. भाजपने अण्णा बनसोडे यांचा तीव्र विरोध दर्शविला होता. त्यामुळे आता बनसोडे समर्थक आक्रमक झाल्याचं पहायला मिळत आहे.


राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांची नेमकी भूमिका काय?

राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांकडून प्रतिक्रिया देण्यात आली. कार्यकर्त्यांची इच्छा आहे की, पिंपरी आणि चिंचवड हे राष्ट्रवादी काँग्रेसचे बालेकिल्ला आहेत तो आम्ही महायुतीतून लढवणारच आहोत. पण चिंचवड आणि भोसरी हे दोन्ही विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मिळावेत. कारण दोन्ही मतदारसंघात २००७ पासून अजित पवार यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेसच्या हाती सत्ता होती. तसेच २०१२ ला ९३ नगरसेवक हे राष्ट्रवादीचे होते. त्यामुळे चिंचवड, पिंपरी आणि भोसरी या तीनही मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद फार मोठी आहे. या तीनही जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मिळावी, असा आम्ही ठरावाच्या माध्यमातून अजित पवार यांच्याकडे विनंती करु, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

## सून चार महिन्यांची गर्भवती, सासुचं धक्कादायक पाऊल; तरुणीच्या मृत्यूने इंदापूर हादरलं!

**पुणे । प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील वडापुरीत एका २३ वर्षीय गर्भवती महिलेचा घरीच गर्भपात केल्याने मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना



घडली आहे. याप्रकरणी इंदापूर पोलिसात मृत महिलेचा पति, सासू-सासरे अशा तिघांवर भारतीय न्याय दंड संहिता २०२३ चे कलम ९०, ९१, ८५, ३(५) नुसार मृत महिलेचा भाऊ विशाल शंकर पवार याच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ऋतुजा राहुल धोत्रे (वय २३ वर्षे) असं मृत्यू झालेल्या महिलेचे नाव असून राहुल भिमराव धोत्रे, लक्ष्मी भिमराव धोत्रे आणि भिमराव उत्तम धोत्रे अशी आरोपींची नावे आहेत. गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदा अस्तित्वात असून ही असं कृत्य केल्यानं या घटनेबाबत प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे.

ऋतुजाचा वडापुरी येथील राहुल धोत्रे याच्याशी सात वर्षापूर्वी विवाह झाला होता. तिला एक मुलगा एक मुलगी अशी अपत्य आहेत. ती चार महिन्याची गर्भवती असताना कुटुंबीयांनी तिची गर्भ तपासणी केली. तिच्या पोटात स्त्री जातीचा गर्भ आहे हे माहिती झाल्यानंतर पती, सासु व सासरे या सर्वांनी मिळून खाजगी डॉक्टर घरी बोलावुन ऋतुजाला गर्भपात होण्याच्या गोळया औषधे देऊन तिचा रविवारी गर्भपात केला. चार महिन्याचे स्त्री जातीचे अर्भक जमिनीमध्ये पुरून टाकले.

मात्र गर्भपतानंतर ऋतुजाचा अति रक्तस्त्राव झाल्याने सोमवारी २३ सप्टेंबर रोजी मृत्यू झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. अधिकचा तपास पोलीस निरीक्षक सुर्यकांत कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गटकुळ करीत आहेत.

# शरद पवारांच्या मराठा आरक्षणावरील भूमिकेवर प्रकाश आंबेडकरांची प्रतिक्रिया

**पुणे । प्रतिनिधी**

मनोज जरांगे हे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषण करत आहेत. त्यांच्या आरक्षणाच्या मागणीवर शरद पवार काल बोलले. मनोज जरांगे यांची आरक्षणाची मागणी योग्य आहे. पण ती मागणी करत असताना इतरांचाही विचार करावा, अशी भूमिका काही नेत्यांनी मांडली. मनोज जरांगेंनी स्वत: सांगितलं की मुस्लीम, धनगर, लिंगायत या समाजाला बरोबर घ्यावं, त्यांचा विचार करावा, अशी मागणी त्यांनी केलीय, असं शरद पवार काल म्हणाले. त्यावर आता वंचितचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आम्ही जे बघतो आहोत ते क्लिअर झाला आहे की शरद पवार मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत आहेत. मराठा आरक्षण सोबत आहेत, असं प्रकाश आंबेडकर म्हणालेत.

आरक्षणाबाबत आंबेडकर म्हणाले

विधानसभा निवडणूक तोंडावर आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षणाबाबत निर्णय घेतील, असं वाटत आहे. ओबीसींनी आता निर्णय घ्यायला हवा. ओबीसी आरक्षण वाचवायच असेल तर ओबीसीचं किमान १०० आमदार निवडून यायला हवेत. ओबीसी कोट्यात शिवसेना उद्धव ठाकरे आणि शरद पवार गट हे ओबीसींसोबत नाहीत हे स्पष्ट झालं आहे. पण



मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देऊ नये याला आमचा पाठिंबा आहे, असं प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं आहे.

बदलापूर प्रकरणावर काय म्हणाले?

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा काल एन्काऊंटर झाला. यावरही प्रकाश आंबेडकरांनी प्रतिक्रिया दिली आहे. मुलींवर अतिप्रसंग अगोदर शोधण्यात शिंदे फडणवीस सरकार कमी पडलं. आरोपींना शोधण्यात सरकार कमी पडलं. एफआयआरमध्ये दुरुस्ती झाली पाहिजे. याची माहिती देण्यात आली. मदतनीस कसे मोकळे सुटतील याची काळजी घेतली गेली. आरोपीला दुसऱ्या केसमध्ये घेऊन जात असताना त्याने रिव्हॉल्व्हर हिसकून घेतले फायरींग केलं. त्यात त्याचा मृत्यू झाला, असं संजय राऊत प्रकाश आंबेडकर म्हणालेत.ज्या पोलिस अधिकाऱ्याला गोळी लागली आहे. त्याच्यासोबत आमची सांगते आहे मात्र शासनाने त्याचा मेडिकल रिपोर्ट सादर करावा, त्याला कुठे लागले कळवा,जी आता चर्चा सुरू आहे. ती थांबेल. आता ज्या केसमध्ये आरोपीला घेऊन जात होते. त्याच्या बायकोच्या तक्रारीबाबत त्याला घेऊन जात होते. नेमकं कशाच्या शोधासाठी त्याला घेऊन जात होते त्याचा खुलासा करावा. सरकारने वस्तुस्थिती समोर मांडवी अशी विनंती करतो. ज्यात संशय राहणार नाही. पोलिसाला लागलेल्या गोळीचा मेडिकल रिपोर्ट पुढे यावा. मांडीला गोळी कशी लागली, समोरून गोळी मारली तर मांडीला कशी लागली हे समोर यावं. या प्रकरणात संशयला वाव मिळत आहे, असं प्रकाश आंबेडकरांनी म्हटलं आहे.

# नागरी सुविधा केंद्रातून दिले ३६ हजार ५३८ दाखले

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्राच्या माध्यमातून (झळाीळि)१ एप्रिल ते २३ सप्टेंबर २०२४ या कालावधीत ३६ हजार ५३८ दाखले काढण्यात आले आहेत, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी दिली.

महापालिकेच्या वतीने नागरी सुविधा केंद्रांच्या माध्यमातून विविध प्रकारची प्रमाणपत्रे, परवाने आदी सेवा प्रदान केल्या जात आहेत. नागरिकांना आवश्यक असणाऱ्या सेवेचा अर्ज ऑनलाईन भरण्यात येतो आणि नागरिक आवश्यक त्या सेवा कोणत्याही अडथळ्याशिवाय प्राप्त करू शकतात. ७/१२ चा उतारा, रहिवास प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र अशी अनेक उपयुक्त कागदपत्रे या माध्यमातून नागरिक प्राप्त करीत आहेत. यासाठी लांबच लांब रांगा लावायची गरज नाही तसेच प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी कार्यालयात असंख्य फेऱ्याही मारण्याची आवश्यकता भासत नसल्याने वेळेचीही बचत होते.

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत महापालिकेच्या वतीने एकूण ९४ नागरी सुविधा केंद्रे उभारण्यात आली असून दाखले काढण्यासाठी नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. नागरिक या केंद्रांवर जाऊन आवश्यक दाखले काढत आहेत. महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्राच्या माध्यमातून १ एप्रिल ते २३ सप्टेंबर २०२४ या कालावधीत विविध दाखले देण्यात आले आहेत. यामध्ये भाडेकरू नोंदणी,




रसवंतीगृह चालू करण्याकरिता परवाना, अग्नि वर्दी प्रमाणपत्र (फायर अटेंडन्स सर्टिफिकेट), एल. पी. जी बॅक रेटीक्युलेशन यंत्रणा, नवीन नळजोड देणे, हॉटेल नुतनीकरण, हॉस्पिटल रजिस्ट्रेशन परवाना नुतनीकरण करणे, नळ कनेक्शन बंद करुन अनामत परत करणे, हॉस्पिटल रजिस्ट्रेशन परवाना देणे (१ते १० बेड ), सिनेमागृह नुतनीकरण, ड्रेनेज बांधकाम परवानगी ना हरकत दाखला देणे, पेट्रोल पंप ना हरकत दाखला, महापालिका हॉल व मैदाने भाड्याने देणे, अनधिकृत नळ जोडणी अधिकृत करणे, इमारत प्लॅन मंजुरी तात्पुरता ना हरकत दाखला, झोपडी हस्तांतर करून फोटो पास, उद्योग धंदा परवाना नुतनीकरण, जल निस्सारण जोडणी देणे, कायमस्वरूपी नळ कनेक्शन बंद करणे, साठा परवाना, पाणीपुरवठा व बांधकाम पूर्णत्वासाठी ना हरकत दाखला, मृत्यू प्रमाणपत्र, नळजोडणी मालकी हक्कात बदल करणे, जाहिरात फलक उभारणीसाठी वृक्ष संवर्धन ना हरकत दाखला, पेट्रोल पंप नुतनीकरण करणे, मालमत्ता कर उतारा, नळ कनेक्शन हस्तांतर करणे, वृक्षसंवर्धन अनामत परतावा, भोगवटा प्रमाणपत्र, मांडव व स्टेज परवाने,विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे,बांधकाम परवानगी मुदत वाढ देणे, अग्निशमन अंतिम ना हरकत दाखला, ड्रेनेज कनेक्शन पूर्णत्वाचा दाखला, झोन दाखला, तात्पुरते किंवा कायमस्वरुपी नळजोडणी खंडीत करणे, कंपन्या तसेच कारखान्याचे ना हरकत दाखले, रॉकेल ना हरकत दाखला, व्यवसाय परवाना, खाद्य नोंदणी प्रमाणपत्रकारिता नागरी स्थानिक संस्थेचे आरोग्य विषयक ना हरकत प्रमाणपत्र आदी दाखल्यांचा यामध्ये समावेश आहे, अशी माहिती महापालिकेच्या वतीने देण्यात आली आहे.

# निळ्यापूररेषीतील २७ अनधिकृत व्यावसायिक बांधकामावर हातोडा

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून (झउचउ)पवना, मुळा व इंद्रायणी या तीन नद्यांच्या निळ्या पुररेषेतील बांधकामांचे नुकतेच सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणामध्ये आढळलेल्या बांधकामापैकी अनधिकृत व्यावसायिक बांधकामावर महापालिकेकडून मंगळवारपासून कारवाई सुरु करण्यात आली.

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने सर्वप्रथम अनधिकृत व्यावसायिक बांधकामावर कारवाई सुरु केली असून मंगळवारी महापालिकेच्या ब, ड, इ क्षेत्रीय कार्यालयामधील तब्बल २७ अनधिकृत व्यावसायिक बांधकामावर कारवाई करण्यात आली. यापुढे संपुर्ण बांधकामे निष्कासित करण्यात येणार असल्याचे अतिक्रमण विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

महापालिकेच्या ‘ब’ क्षेत्रीय



कार्यालयामध्ये ६ अनधिकृत व्यावसायिक बांधकामावर कारवाई करण्यात येऊन अंदाजे ५५०० चौरस.फूट क्षेत्र पाडण्यात आले आहे. सदर कारवाईमध्ये २० एमएसएफ जवान कारवाईसाठी उपस्थित होते. त्यासोबतच कारवाईसाठी २ जेसीबी वापरण्यात आले. ‘ड’ क्षेत्रीय कार्यालयामध्ये ११ अनधिकृत वीटबांधकाम व पत्राशेडवर कारवाई करण्यात येऊन अंदाजे १६, ००० चौरस.फूट क्षेत्र पाडण्यात आले आहे. याकारवाईसाठी क्षेत्रीय अधिकारी, ३ अतिक्रमण अधीक्षक, ८ बीटनिरीक्षक, १० पोलीस कर्मचारी व १५ मजूर उपस्थित होते. याकारवाईसाठी २ जेसीबी, १ ट्रॅक्टर ब्रेकर अशी यंत्रणा उपस्थित होती.

याचबरोबर, ‘इ’ क्षेत्रीय कार्यालयामध्ये, १० अनधिकृत व्यावसायिक बांधकामावर कारवाई करण्यात येऊन अंदाजे १६,४०० चौरस.फूट क्षेत्र पाडण्यात आले आहे. यासाठी ४ क्षेत्रीय अधिकारी, १ अतिक्रमण अधीक्षक, ६ बीटनिरीक्षक, ३० पोलीस कर्मचारी व ५ मजूर त्याबरोबर, याकारवाईसाठी २जेसीबीची यंत्रणा वापरण्यात आली.



# आळंदीमध्ये महिला मोर्चा संवाद बैठकीचे आयोजन

पुणे जिल्हा विधानसभा निवडणुक पूर्व तयारी दौऱ्याच्या निमित्ताने आज दि.२४ रोजी आळंदीमध्ये महिला मोर्चा संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या संवाद बैठकीस गुजरातचे माजी गृहमंत्री प्रदीपसिंह जडेजा यांचे मार्गदर्शन लाभले.या संवाद बैठकीत विविध योजनांवर विस्तृत चर्चा झाली. तसेच यावेळी प्रदिपसिंह जडेजा यांनी संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधीचे दर्शन घेतले.श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी महेश मोदी, रामशेठ गावडे,संजय घुंडरे,गणेश गरुड व इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.तदनंतर प्रदीपसिंह जडेजा हे खेड येथील बैठकी साठी रवाना झाले.

# विकसीत भारत : एक साकारणारे स्वप्न - किरण रिजिजू

**पुणे । प्रतिनिधी**

भारत २०४७ पर्यंत आत्मनिर्भर होण्यासाठी विद्यार्थ्यांनी भारताचे दूत व्हावे. त्यासाठी प्रत्येकाने स्वत:ला काय करता येईल याचा विचार करावा. युवा पिढी घडवत असताना गरीबी निर्मूलन, साक्षरता, सतत काम करण्याची वृत्ती हे विकसित भारताचे आधारस्तंभ आहेत. यामुळे भारताची लोकशाही ही तिसऱ्या स्थानावरुन पुढे जाईल, असा विश्वास केंद्रिय संसदीय कामकाज मंत्री डॉ. किरण रिजिजू यांनी व्यक्त केला.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या वतीने आयोजित विकसित भारत युवा कनेक्ट या कार्यक्रमा अंतर्गत केंद्रिय मंत्री रिजिजू यांनी संस्थेच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ गजानन एकबोटे, सरकार्यवाह डॉ. जोत्स्ना एकबोटे, सहकार्यवाह प्रा सुरेश तोडकर, प्राचार्य डॉ . राजेंद्र झुंजाराव, डॉ संजय खरात, डॉ कल्याणी जोशी, सर्व शिक्षक, प्राचार्य, नियामक मंडळाचे सदस्य यावेळी उपस्थित होते. रिजिजू यांच्या हस्ते रोप लाऊन कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. प्रत्येक युवा विकसीत भारताचा दूत बनला पाहिजे,



असे आवाहन रिजिजू यांनी युवा पिढीला यावेळी केले. त्यांनी खेळाडूंशीही संवाद साधला. सुरवातीला उपकार्यवाह डॉ. निवेदिता एकबोटे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. यामध्ये २०४७ साली भारत कसा असेल, त्याची रूपरेषा कशी असेल. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या सहभागाबाबद संवाद साधला.

डॉ गजानन एकबोटे यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला. या कार्यक्रमात १००० पेक्षा जास्त विद्यार्थांनी सहभाग घेतला. कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख यांनी आभार मानले.